


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ८ * * नागपूर * रविवार, दिनांक ६ एप्रिल २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




# महासागर पत्रकारांची अनुभव शाळा

## सेवानिवृत्त न्यायाधिश डागा यांच्याकडून कौतुकाची थाप : कर्मयोगी पुरस्काराचे थाटात वितरण




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

मानवाची महत्वकांक्षा ही त्याला पडलेले स्वप्न असून हे स्वप्न आपल्या कर्तुत्वातून सिद्ध करण्याची ताकद दैनिक महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक यांनी दाखवून दिली आहे तेव्हाच हे वृत्तपत्र आज ५५ वा वर्धापन दिवस साजरा करीत आहे. आर्थिक विवंचनेतून जात असताना श्रीकृष्ण चांडक यांच्याशी पक्षकार म्हणून झालेल्या भेटीत हा साक्षात्कार झाला. ५५ वर्षांच्या काळात अनेक पत्रकार येथून शिकून मोठे झाले आहेत व प्रदीप मैत्र, मोरेश्वर बडगे व शाम जुवेकर यांच्यासारखे कित्येक पत्रकार नावालौकिकास आलेले आहेत त्यामुळे दैनिक महासागर ही पत्रकारांची अनुभव शाळा आहे, असे प्रतिपादन महासागर कर्मयोगी पुरस्कार २०२५ या सोहळ्याचे अध्यक्ष कायदे पंडित सेवानिवृत्त न्यायमूर्ती विजय डागा यांनी केले.

दैनिक महासागरच्या ५५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महासागर कर्मयोगी पुरस्कार २०२५ या सोहळ्याचे आयोजन माहेश्वरी भवन येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून कायदे पंडित जस्टीस विजय डागा, वाघमारे मसाले उद्योगाचे मालक प्रकाश वाघमारे, आयकर विभागाचे सहआयुक्त संजय अग्रवाल, अॅड. सुरेश ढोले, दैनिक महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक उपस्थित होते.

टेकडी रोडवरील माहेश्वरी भवन येथे आयोजित या कार्यक्रमाला भरगच्च उपस्थिती होती. दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक यांनी महासागरच्या खडतर प्रवासाचे वर्णन केले. ज्याला कष्ट करायचे आहे त्यांनी वृत्तपत्र चालवावे आणि जो सत्यनिष्ठा बाळगून मेहनत करण्याची तयारी ठेवतो तोच पत्रकार आहे बाकी पत्रावळीकर आहे. दैनिक महासागर च्या ५४ वर्षांच्या काळात अनेक अडचणींचा व कर्जबाजारीपणाचा सामना करावा लागला. एक वेळ अशी आली की घरचे सोने चांदी दागिने विकावे लागले. पण मी डगमगलो नाही. देवेंद्र फडणवीस यांनी वृत्तपत्राचे दर त्या काळाच्या तुलनेत अडीच पटीने वाढवून पत्रकारितेला सुवर्ण दिवस आणून दिले आणि आज जे चांगले दिवस पाहायला मिळत आहे त्याचे सर्व श्रेय मुख्यमंत्री फडणवीस यांना जाते, असे सांगत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.



श्रीकृष्ण चांडक, उमाशंकर लाल, पंकज चांडक, राहुल चांडक, विशाल चांडक, सरिता चांडक, ममता चांडक, प्रविण डबली, प्रभाकर दुपारे आदिंनी अतिथींचे स्वागत केले.

याप्रसंगी वैद्यकीय क्षेत्रातील महासागर कर्मयोगी पुरस्कार उपचार महर्षी पद्मश्री डॉ. विलास डांगरे, पत्रकारिता क्षेत्रातील पुरस्कार पत्रतपस्वी कमलाकर धारप, सेवाभावी संस्था म्हणून प्रगती राजस्थानी महिला मंडळ आणि तळागाळातील व्यक्तीच्या विकासासाठी झटणारे डॉक्टर हरीश धुरट यांना विजय डागा आणि प्रकाश वाघमारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

आपल्या भाषणात विजय डागा पुढे म्हणाले की लोकशाहीसाठी आवश्यक असलेली पत्रकारितेतील पारदर्शकता, स्वतंत्रता सरकारी नियंत्रणांमुळे व खाजगी कंपन्यांची मालकी किंवा व्यक्तीचा ताबा यामुळे धोक्यात आलेली आहे.

सोशल मीडिया सारख्या तंत्रज्ञानाचा गैरवापर करून खोट्या बातम्या पसरविल्या जात आहे यावर अंकुश येणे गरजेचे आहे.

यावेळी बाळासाहेब ठाकरे, नरेंद्र मोदी, लता मंगेशकर, अटल बिहारी वाजपेयी यांच्यासारख्या गणमान्याना आपली होमिओपॅथी चिकित्सा देऊन बरे करणारे डॉक्टर विलास डांगरे म्हणाले की सत्य तत्वावर आधारित होमिओपॅथी चिकित्सा ही अजूनही उपेक्षित व विडंबित आहेत ही चिकित्सा तळागाळातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याचा माझा प्रयत्न आहे. समाजकारण व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सानिध्यातून मला गोरगरिबांची सेवा करण्याची प्रेरणा मिळाली आणि ही सेवा ही अखंडपणे करीत आहे अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. कष्टकरी कामगार व माथाडी कामगारांचे दैवत असणारे सामाजिक कार्यकर्ते हरीश धुरट हे म्हणाले की दारिद्रय रेषेवरील माणूस आपल्या डोक्याचा वापर हा विकास प्रक्रियेसाठी करीत असतो तर रेल्वे स्थानावरील कुली, भारवाहक, कष्टकरी कामगार हे आपल्या डोक्याचा वापर आपल्या पोटासाठी करत असतात.

50 किलो वजन असणारे व्यक्ती 100 ते 110 वजनी भार उचलून नेतात. या विरुद्ध लढा देऊन 1998 सांगली राष्ट्रपतींनी 50 किलो वजनी माणसाने 50 पेक्षा कमी वजन उचलण्याचा आदेश काढला तो 2011 पर्यंत अमलात येईपर्यंत आंदोलन करावे लागले.

यावेळी जेष्ठ पत्रकार कमलाकर धारप यांनी आपल्या पत्रकारितेतील 50 वर्षाचा प्रवास उलगडला तर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्वच स्तरावर सामाजिक बांधिलकी बांधणाऱ्या प्रगती राजस्थान महिला मंडळ च्या अध्यक्ष सरला सोमानी यांनी महासागर वृत्तपत्राकडून या पुरस्कारासाठी आमची निवड करून आमच्या उत्कृष्ट कामाची पावती दिली आहे. त्याबद्दल आम्ही आभारी असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

यावेळी मंचावर दैनिक महासागर चे सीईओ उमाशंकर लाल, प्रभाकर दुपारे, राहुल चांडक, पंकज चांडक, विशाल चांडक, प्रवीण डबली, कमल नामपल्लीवार व समस्त महासागर परिवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन रेखा दंडीगे घीया यांनी केले तर प्रवीण डबली यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महासागरचे विदर्भातील जिल्हा प्रतिनिधी, वार्ताहर, प्रतिनिधी, नागपूर कार्यालयातील सर्व कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील बड्या काँग्रेस नेत्यांवर कारवाई होण्याचे संकेत

### वक्फ भूखंड घोटाळ्यात हात असल्याचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

वक्फ भूखंड घोटाळ्यात हात असणाऱ्या काँग्रेसच्या राज्यातील बड्या नेत्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका इंग्रजी वृत्तपत्राशी बोलताना दिला आहे. त्यांच्या या इशाऱ्यामुळे वेगवेगळ्या मुद्यांवरून महायुती सरकारला धारेवर धरणाऱ्या काँग्रेसच्या गोटात एकच खळबळ माजली आहे.



संसदेने वक्फ दुरुस्ती विधेयकावर आपली मोहोर उमटवली आहे. आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या विधेयकावर स्वाक्षरी केल्यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर होईल. हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्रात मोठ्या घडामोडी घडण्याचे संकेत आहेत. तसे संकेत स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेत.

त्यांच्या मते, वक्फ कायदा अस्तित्वात आल्यानंतर वक्फ भूखंड घोटाळ्यात समावेश असणाऱ्या काँग्रेसच्या अनेक मोठ्या नेत्यांवर कारवाई केली जाईल.

देवेंद्र फडणवीस द हिंदू या इंग्रजी वृत्तपत्राशी बोलताना म्हणाले, महाराष्ट्रात 2000 ते 2014 या कालखंडात वक्फ भूखंड घोटाळा झाला. या घोटाळ्यातील काँग्रेसच्या राज्यातील अनेक नेत्यांचा हात असल्याचे निष्पन्न झाले. काँग्रेसने वक्फची बहुतांश जमीन बळकावली आहे. काँग्रेसच्या सर्वच बड्या नेत्यांची त्यात नावे होती. मी विधानसभेच्या पटलावरही हा मुद्दा मांडला होता. या प्रकरणाच्या चौकशीसाठी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने ही जमीन या नेत्यांनी बळकावल्याचा अहवाल दिला होता. आता आमचे सरकार या अहवालात नमूद नेत्यांवर योग्य ती कारवाई करेल.

यावेळी त्यांना या घोटाळ्यात सहभागी असलेल्या काँग्रेसच्या नेत्यांची नावे विचारली असता त्यांनी ती उघड करण्यास नकार दिला. मला या नेत्यांची नावे आठवत नाहीत, पण त्यात अनेक प्रमुख नेत्यांच्या नावांचा समावेश होता, असे ते म्हणाले.

फडणवीस पुढे म्हणाले, वक्फ दुरुस्ती विधेयकाचा हिंदुत्वाशी कोणताही संबंध नाही. हे विधेयक लोकशाहीवादी, समाजवादी प्रजासत्ताक भारताच्या घटनात्मक भावनेशी सुसंगत आहे. त्यामुळे समाजाच्या फायद्यासाठी हे विधेयक मंजूर करण्याचा निर्णय अत्यंत ऐतिहासिक आहे.

## दिवंगत अभिनेते मनोज कुमार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :

अभिनेता-दिग्दर्शक मनोज कुमार यांच्यावर शनिवारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे पार्थिव तिरंग्यात गुंडाळून मुंबईतील जुहू येथील पवनहंस स्मशानभूमीत आणण्यात आले. येथे त्यांना २१ तोफांची सलामी देण्यात आली.



त्यांचा मुलगा कुणाल गोस्वामी यांनी मुखाग्नी दिला. प्रेम चोप्रा, सलीम खान, सुभाष घई, अमिताभ बच्चन आणि अभिषेक बच्चन हे त्यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित होते.
मनोज कुमार यांचे शुक्रवारी निधन झाले. त्यांनी मुंबईतील कोकिलाबेन रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला.

## मुस्लिम संघटनांकडून उद्धव ठाकरे यांचे कौतुक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :

मुस्लिम संघटनांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या विरोधात घेतलेल्या भूमिकेचे स्वागत केले आहे.

प्रस्तुत विधेयकाला विरोध करून उद्धव ठाकरे यांनी योग्य पाऊल उचलले आहे. कारण, या विधेयकाच्या अंमलबजावणीमुळे वक्फच्या जमिनीचा वापर इतर कामांसाठी होण्याची शक्यता आहे, असे त्यांनी म्हटले आहे. ठाकरे गटाने या विधेयकावरील मतदानावेळी विरोधात भूमिका घेतली. सरकार वक्फ बोर्डाची लाखो एकर जमीन उद्योगपतींच्या घशात घालण्याचा प्रयत्न करत आहे, अशी एकंदर भूमिका ठाकरे गटाने घेतली आहे.




## वाघाच्या हल्ल्यात युवा शेतकरी ठार

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ५ :

मूल तालुक्यातील चितेगाव येथे शनिवारी सकाळी शेषराज पांडुरंग नागोशे (३८) या युवा शेतकऱ्यावर वाघाने हल्ला केला असता त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दोन दिवसात वाघाच्या हल्ल्यातील हा दुसरा बळी असून या वर्षात चार महिन्यात नऊ जणांचा बळी घेतला आहे.


वन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शेषराज हे त्यांच्या शेतातील भाजीपाला पिकाला पाणी देण्यासाठी गेले होते. उमा नदीच्या परिसरात असलेल्या त्यांच्या शेतात दबा धरून बसलेल्या वाघाने त्याच्यावर अचानक हल्ला केला. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती वन विभागाला देण्यात आली त्यानंतर वन पथक घटनास्थळी दाखल झाले. यावेळी मृतदेहाचा पंचनामा करण्यात आला. या घटनेमुळे गावात भीती व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



# जगातील सर्वात मोठा, अंतर्गत लोकशाही असलेला पक्ष 'भाजप'

**भारतीय जनता पक्ष हा एक राजकीय पक्ष आहे या पक्षाची विचार धारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संलग्न आहे. राष्ट्रभक्तीचा विचार, समानतेचे उद्दिष्ट आणि केलेली विकासकामे या आधारांवरच हा पक्ष उभा राहीला. जनसंघातुन बाहेर पडलेल्या लोकांनी अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली ६ एप्रिल १९८० रोजी भारतीय जनता पक्षाची स्थापना केली. अटलबिहारी वाजपेयी हे पक्षाचे पहिले अध्यक्ष झाले. आज भारतीय जनता पक्षाचा ४५ वा स्थापना दिवस आहे, त्यानिमित्ताने....**

भाजपच्या स्थापनेच्या वेळी अटलजी म्हणाले होते. `अंधेरा छटेगा, सुरज निकलेगा, कमल खिलेगा`. देशभक्तांचा पक्ष असलेल्या भाजपच्या अटलजींना विरोधी पक्षनेता असूनही तेंव्हाचे पंतप्रधान कै. नरसिंह राव यांनी युनो मध्ये भारताची बाजु मांडायला पाठविले होते हे असे भारतातले पहिलेच उदाहरण आहे. अश्या रीतीने जनसंघाची निशाणी पणती ते बीजेपीचे कमळ फुलतच गेले. आज भारतीय राजकारणात खऱ्या अर्थाने कमळ फुललेलं दिसत आहे. १९८४ मध्ये झालेल्या ८ व्या लोकसभा निवडणुकीत भाजपला दुसऱ्या क्रमांकाची मते मिळूनही फक्त दोनच जागा मिळाल्या होत्या. पण रामजन्मभूमीच्या आंदोलनास गती दिल्या नंतर भाजपची ताकद वाढली व भाजपचा दिल्ली मधे जाण्याचा मार्ग सुकर झाला. भाजपला हे आंदोलन फलदायी ठरले. अनेक राज्य निवडणुकीतील विजय आणि राष्ट्रीय निवडणुकीतील चांगल्या कामगिरीमुळे १९९६ मध्ये भाजप संसदेतील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला. परंतु त्या वेळेस संसदेच्या सभागृहात भाजपकडे बहुमत देखील नव्हते. त्यामुळे त्या वेळेचे नेते अटलबिहारी वाजपेयी यांचे आघाडीचे सरकार फक्त १३ दिवस टिकले. १९९८ च्या सार्वत्रिक निवडणूकी नंतर पंतप्रधान वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भाजपच्या नेतृत्वाखालील युतीने एक वर्षभर सरकार चालवले. पण नंतर लगेच झालेल्या निवडणुकांनंतर आलेले वाजपेयीचे एनडीए सरकार पुर्ण काळ टिकले. असे राज्य करणारे हे पहिले बिगर काँग्रेसी सरकार होते. २००४ च्या सार्वत्रिक




निवडणुकीत `एनडीए`ला अनपेक्षितपणे पराभव स्वीकारावा लागला आणि पुढील दहा वर्षे भाजप प्रमुख विरोधी पक्ष म्हणून राहीला. गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाला प्रचंड विजय मिळवुन दिला. या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने २००४ नंतरच्या दोन निवडणुकीतील अपयश धुऊन काढीत तब्बल २८२ जागा व लोकसभा जिंकली. हेच पुढे चालवत २०१९ मध्ये ३०० व २०२४ मध्ये २४० जागा जिंकल्या. मोदी सरकारच्या काळात भाजप आणि संघ यांच्यातील संबंध अधिक मजबूत झाले. `आरएसएस`ने भाजपच्या निवडणूक मोहिमांना संघटनात्मक पाठिंबा दिला. मोदी सरकारने राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य दिले व अनेक दिर्घकालीन संरक्षण सुधारणा अंमलात आणल्या. देशाच्या परराष्ट्र व आर्थिक धोरणात आमूलाग्र बदल केले व पायाभूत सुविधा विकसित केल्या आणि विकसित भारताकडे वाटचाल सुरु केली. हिंदुत्व व राष्ट्रवादी विचार असलेले श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी जनसंघाची स्थापना केली. यामुळेच भाजपच्या निर्मितीचा पाया रचला गेला. समान नागरी कायदा, गोहत्या बंदी कायदा, जम्मू काश्मीरला इतर राज्यांप्रमाणे समान दर्जा या मागण्या मुखर्जी यांच्याच होत्या, ज्या ३७० कलमाच्या विरोधात आंदोलन करते वेळी त्यांचा जीव गेला. ते कलम त्यांच्या मृत्यूनंतर ६६ वर्षांनी आता रद्द करण्यात आले.




प्रदीप पाटील
भाजप, प्रदेश कार्यकारिणी सदस्य
९९६०४९५४९५

## पंडित दिनदयाळ उपाध्याय यांचा महान विचार

**एक देश में दो विधान, एक देश में दो निशान,**
**एक देश में दो प्रधान, नहीं चलेंगे, नहीं चलेंगे**

राष्ट्रभक्तीने भारलेल्या ३७० कलम विरोधी घोषणांनी वातावरण निर्मिती झाली होती. देशाचे ऐक्य अबाधित राखण्यासाठी त्यांनी आपले बलिदान दिले. भाजप ज्या एकात्म मानवतावाद चे समर्थन करते, तो पंडित दिनदयाळ उपाध्याय यांचा विचार आहे. मोदी यांच्या नेतृत्वातील योजना साकारण्यामागे एकात्म मानवतावाद आहे. अखंड समाजाचा विचार करणाऱ्या पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या चिंतनावर विचार करण्याची देशाला गरज आहे. ते भारतीय जनसंघाचे सहसंस्थापक होते. त्यांच्या विचारांची समाजाला जाणीव करुन देण्यासाठी अंत्योदय दिन साजरा केला जातो. अंत्योदय म्हणजे समाजातील सर्वात गरीब व मागासलेल्या व्यक्तीला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे आहे. भाजप त्यासाठी कटिबध्द आहे. राजस्थानचे माजी मुख्यमंत्री कै.भैरोसिंह शेखावत यांनी पहिल्यांदा ही संकल्पना त्यांच्या राज्यात राबवली होती. ९ जुन २०२४ रोजी पंतप्रधानपदी शपथ घेतल्यानंतर तिसऱ्यांदा सत्तेत आलेल्या पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात परराष्ट्र संबंध विशेषत: गल्फ व आफ्रिकन देशांबरोबर सुधारले आहेत ब्रिक्स संघटनेत वाढ होत आहे. संरक्षण उत्पादनाचा एकेकाळचा एक नंबर आयातदार भारत आता निर्यात करतो आहे. विमानवाहू जहाजे (एअरक्राफ्ट कॅरियर) बांधणी करु शकतो. दिल्लीतील भारतीय सैन्यदलांना परदेशी संरक्षण उत्पादने विकणाऱ्यांची लॉबी आता नष्ट झाली आहे. रेल्वे प्रवासात सुधारणा व कलकत्ता ते चेन्नई डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर सुरु होणे, काश्मिरमधे श्रीनगर पर्यंत रेल्वे मार्गाने जाणे, देशांतर्गत महामार्गाचे प्रचंड विस्तारीकरण आणि सागरमाला प्रकल्पांतर्गत नवे जलमार्ग विकसित करणे अश्या बऱ्याच सुधारणा झाल्या आहेत या सरकारच्या कालावधीत. पुर्वी योजना घोषित झाल्यावर कधी पूर्ण होईल, याची खात्री नसायची. पण हे सरकार स्थापनेच्या नंतर केलेल्या घोषणा त्यांच्या पाच वर्षांच्या कालावधीत पुर्ण करतेच हा फरक जनतेने लक्षात घेतला आहे. महाराष्ट्र विधानसभेत १३२ जागा आणि निर्विवाद बहुमत देवून त्यावर शिक्कामोर्तब केले आहे.

## ➤ महत्त्वाचे

### खाजगी हॉस्पिटलच्या मनमानी कारभारावर शासनाने आळा घालावा

**नाशिक ।** पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तातडीनं उपचार न मिळाल्यानं श्रीमती तनिषा भिसे ह्या महिलेचे दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची गंभीर दखल घेऊन शासनाने त्वरित दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलवर कारवाई करत. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी छावा मराठा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ विलास पांगारकर यांनी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांना निवेदन दिले. राज्यात खाजगी हॉस्पिटलाचा मनमानी कारभार सुरू आहे. सर्वसामान्य रुग्णांची हेळसांड होत आहे. कुठलाही रुग्ण दवाखान्यात येण्या अगोदर त्याच्याकडून आधी पैसे घेतले जातात. त्यानंतर उपचार केले जातात. त्यामुळे रुग्णांचे मोठे हाल होतात. वेळेत उपचार न मिळाल्याने रुग्ण दगावतो. त्यामुळे शासनाने खाजगी रुग्णालयातील दरांवर नियत्रन ठेवावे. रुग्णाच्या जीवाशी हलगर्जी पणा करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करून त्यांची मान्यता रद्द करावी अशा प्रकारची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.



### संवेदनशीलतेशिवाय कविता कळत नाही : पवार

**नाशिक ।** कवी आपल्या कवितांतून भोगलेले-अनुभवलेले मांडत असतो. त्याची कविता अनुभवण्यासाठी तितकेच संवेदनशील




असावे लागते. म्हणूनच संवेदनशीलता असल्याशिवाय कविता कळत नाही, असे प्रतिपादन कवी सुभाष पवार यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित `पुस्तकावर बोलू काही` या उपक्रमात `धुमसते सूर` या पुस्तकावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बाळनाथ शिंदे होते. सुभाष पवार पुढे म्हणाले की, कवी नेहमी समाज, निसर्ग, वेदना, भावना, माणूस अशा विविध विषयांवर कवी लिखाण करत असतो. पाऊस आणि कवी यांच नातं कधीच संपणारं नाही. म्हणून नदीचा पूर आणि डोळ्यातला अश्रूंचा पूर हे क्षण कवीच्या कवितांमध्ये प्रतिबिंबित होतात, असे सांगून त्यांनी काही कविताही सादर केल्या. अशोक पवार, प्राचार्य यू.के.आहिरे या श्रोत्यांना ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आले. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन तर अशोक पाटील यांनी आभार मानले. दरम्यान येत्या मंगळवारी (दि.८) `वसंत व्याख्यानमाला- शतकोत्तर वाटचाल` या पुस्तकावर श्रीकांत बेणी ऐसपैस गप्पा करणार आहेत.

## गौरी सावंत यांच्या हस्ते सप्तश्रृंगीचरणी चांदीचा मुकूट अर्पण



**नाशिक ।** साडेतीन शक्तीपीठांपैकी महत्त्वाचे मानले जाणारे शक्तिपीठ अर्थातच सप्तशृंगी देवी या आदिशक्तीला किन्नर आखाड्याचे महामंडलेश्वर पायल नंदगिरी, भगवती नंदगिरी,तसेच थोर समाजसेविका गौरी सावंत यांच्यामार्फत चांदीचा मुकुट अर्पण करण्यात आला. चैत्र-पौर्णिमेच्या यात्रा उत्सवाच्या सुरुवातीला काही दिवस आधीच हा मुकुट अर्पण करण्याचा मानस संबंधित महामंडलेश्वर पायल नंदगिरी यांनी केला होता. या अनुषंगाने या मुकुटाची सप्तशृंगी गड येथे राजेश्वरी भक्तनिवास येथे विधिवत पूजन करण्यात आली. तसेच सप्तशृंगी गड परिसरातून याची भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर राजेश्वरी भक्तनिवास येथे होम यज्ञ व विविध प्रकारच्या विधिवत पूजा करत हा मुकुट दिनांक पाच एप्रिल रोजी सकाळी सप्तशृंगी देवीच्या चरणी अर्पण करण्यात आला. याबाबत अधिक माहिती घेतली असता समाजसेविका गौरी सावंत यांच्या म्हणण्यानुसार ही महाराष्ट्रातील पहिलीच घटना होय जी की, किन्नर समुदायाच्या वतीने आदिशक्तीला किंवा कुठल्याही देवस्थानाला एवढी मोठी भेटवस्तू देणे, एरवी किन्नर समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळाच असतो. त्यामुळेच आमच्या किन्नर समुदायाच्या वतीने आम्ही हा मुकुट आई जगदंबे चरणी अर्पण करीत आहोत. या मुकुट अर्पण मिरवणुकीत नाशिक जिल्ह्यातील विविध ठिकाणाहून किन्नर समुदायातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. तसेच त्यांचा भक्त परिवार सुद्धा यावेळी उपस्थित होता. विविध राजकीय क्षेत्रातील मान्यवर सुद्धा यावेळी उपस्थित होते.



# ।। चराचरातील स्फूर्ती राम ।।

चैत्र शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला साजरी होणारी रामनवमी केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच महत्त्वाची नाही तर सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची आहे. प्रभू श्रीराम आपल्याला नेहमीच सत्य, न्याय आणि धर्माच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतो. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र हे आपल्या भारतीय संस्कृती आधारस्तंभ आहेत. प्रत्येकाच्या हृदयात ते विराजमान आहेत. त्यांचे जीवन म्हणजे संपूर्ण राष्ट्राला त्यांनी जगण्याचा मार्ग दाखवलेला आहे. संसारात राहून सामाजिक, नैतिक, कौटुंबिक आणि राजकीय मर्यादा पाळून पुरुष सदाचरणी राहू शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रभू श्री रामचंद्र.

हिंदू पंचागानुसार चैत्र महिन्यात चैत्र शुध्द नवमीस प्रभू रामाचा जन्म झाला.त्या दिवशी सर्व ठिकाणी रामनवमीचा सोहळा उत्साहात साजरा केला जातो. मंदीरांना रंगरंगोटी केली जाते.समोर. सभा मंडप उभारले जातात. रंगीबेरंगी पताका लावल्या जातात. विद्युत रोषणाई केली जाते.संपूर्ण देशभरात रामनवमी उत्साहात साजरी केली जाते.अयोध्ये पासून ते रामेश्वर पर्यंत हा सोहोळा साजरा होतो. आपल्या संस्कृतीत हा दिवस अतिशय महत्वाचा मानला जातो. माध्यान्य काळी सुर्य डोक्यावर येतो तेव्हा ठीक बारा वाजता राम जन्माचा सोहळा साजरा करतात. त्याआधी रामजन्मावर आधारित कीर्तन, प्रवचन होते.ते बरोब्बर बारा वाजता संपताच, गुलाल उधळून, जयजयकार केला जातो,वाजंत्री वाजते. फटाके फोडले जातात. बत्ताशांची उधळण होते. हा प्रसाद मिळवण्यासाठी हजारो भाविक गर्दी करतात. पाळणा हलवला जातो. काही ठिकाणी जन्माचा पाळणाही म्हणतात. रामाची आरती करुन बत्तासा, सुंठ, धणे गुळाचा प्रसाद, सुंठ वडा (पंजिरी) वाटला जातो.

रामनवमीच्या उत्सवाची सुरूवात काही मंदिरात गुढीपाडव्या पासून होते,तर काही मंदिरात रामनवमी पासून पुढे आठ दिवस कार्यक्रम होतात. या काळात नैमित्तिक भजन, कीर्तन, प्रवचनाचे कार्यक्रम असतात. काही विशेष कीर्तनकारांची, प्रवचनकारांचे कार्यक्रमांचेही खास आयोजन केले जाते. गीत रामायणकार ग.दी. माडगूळकर आणि गायक सुधीर फडके (बाबूजी) यांनी गीतरामायण हा कार्यक्रम अजरामर केला. गीत रुपाने रामायणातील प्रसंग त्यानी आपल्या गीतातून डोळ्या समोर उभे केलेत. अनेक ठिकाणी गीतरामायणाचे कार्यक्रमाच आयोजन आठवडाभर केल जात. श्रोते मंडळींना ह्या काळात ही खास मेजवानीच असते. श्रीरामास भगवान श्री विष्णूचा सातवा अवतार समजला जातो.देवता आणि अवतार यांच्या जन्मदिवशी त्यांचे तत्व भूतलावर अधिक प्रमाणात कार्यरत असते.श्री रामही अवतारी देवता असल्यामुळे श्रीराम नवमीला श्रीराम तत्व हे हजार पटीने कार्यरत असल्याचे मानले जाते.म्हणून ह्यादिवशी श्रीरामरक्षा पाठ,श्रीराम जय राम जय जय राम.ह्या मंत्राचा जप, केल्याने अधिक पटीने लाभ मिळत असतो. म्हणून अनेक मंदिरात राम नाम जपाची बारी लावून अखंड जप केला जात असल्याचे दिसते.गुढीपाडवा ते रामनवमी ह्या काळात दररोज १३ वेळा रामरक्षा स्तोत्र श्रद्धापूर्वक म्हटल्यावर ते सिद्ध होते.रामरक्षेत प्रत्येक अवयवांचे साठी स्वतंत्र श्लोक आहे. त्यामुळे त्या त्या अवयवांचे विकार बरे होतात..

राम रक्षा पठेत् प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम् ।
शिरो मे राघवः पातु भालं दशरथित्मजः ।।
कौसल्येयो दृशौपातु विश्वामित्रप्रियः श्रुती ।
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ।
जिह्वां विद्यानिधिः पातु कण्ठं भरतवन्दितः ।
स्कन्धौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ।।
करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजितः ।
मध्यं पातु खरध्वंसी नाभिं जाम्बवदाश्रयः ।।
सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः ।
उरु रघुत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ।।
जानुनी सेतुकृत्पातु जंघे दशमुखान्तकः ।
पादौ बिभीषणश्रीदः पातु रामोऽखिलं वपुः ।।

असे कवच या रामरक्षा स्तोत्रात आलेले आहे. कवच म्हणजे आपल्या प्रत्येक अवयवाचे रक्षण करण्यासाठी मंत्र धारण करणे.

पातालभूतलव्योम चारिणश्छद्मचारिणः।
न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः ।।

पाताळ भूमी आणि आकाश या तिन्ही लोकांत संचार करणारे छद्मचारिणः म्हणजे राक्षस राम नावाने रक्षलेल्या लोकांकडे नजर वर उचलून पाहू शकत नाही. म्हणूनच रामरक्षा,। रामस्तुतीचे पठण,. हनुमानाचे हनुमान चालीसा पठण, राम नामाचा जप, रामचरितमानसाचे पठण,. केल्याने संकट निवारण होते दुःखापासून मुक्ती मिळते मनोकामना पूर्ण होतात सुख-समृद्धी होते.

रामरामेति रामेति रमे रामे मनोरमे ।
सहस्त्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने ।।




दिलीप देशपांडे, जामनेर
८९९९५६६९१७

उत्सव काळात मंदिरातील मूर्तीला, विविध प्रकारचे पोषाख, फुलांचे हार चढवले जातात. तसेच ह्याच काळात काही शहरात एक दिवस रथयात्रेच आयोजन असते.रथातून श्रीरामाची नगर प्रदक्षिणा असते.सकाळी साडेसात -आठ वाजता रथयात्रेस प्रारंभ होतो.रथाला दोर लाउन रथ ओढला जातो.प्रदक्षिणेच्या मार्गावर घराघरातून आरती,(त्याला कानगी म्हणतात. त्यात बत्ताशे, पाच खारका ,आणि संस्थानला देणगी रुपात काही रक्कम असते.) दिली जात असते. आपल्याला त्यांच्याकडून बत्तासे आणि पंजीरीचा प्रसाद मिळतो. उन्हाची पर्वा न करता ढोल-ताशा,लेझीम पथक उत्साहानं लेझीम खेळत असतात. काही ठिकाणी बाहेर गावाहून लेझीम पथक बोलावली असतात.गोफ पथक असतात.संध्याकाळी साडेपाच -सहा वाजता रथयात्रा स्थानी पोहचते. उत्सवाचेच काळात पालखीतूनही श्रीरामाची नगर प्रदक्षिणा होते.

अनेक ठिकाणांच्या उत्सवातून दशावतार(अनेकदा यांना दशावतारी सोंग) काढले जातात.माणंसच मुखवटे धारण करुन नाचतात.प्रत्येक अवतार प्रगट होतांना फटाके फोडले जातात आणि तो अवतार प्रकट होतो.वाद्यांच्या तालावर ते नाचतात. एकेक अवतार साधारणपणे पंधरा-वीस मिनिटे ते अर्धा तास नाचतो. त्यात, मत्स्यावतार,देवी, खंडोबा,नारसिंह, राजा, महिषासुर असे अनेक प्रकार असतात.अनेक वर्षा पासूनची ही प्रथा चालत आली आहे. मध्यरात्री पर्यत हा कार्यक्रम असतो. जळगाव भागात,जळगाव येथे चिमुकले राम मंदिर, जुन्या जळगावातील राममंदिर, जामनेर येथील नगारखाना भागातील राममंदिर,येथे मंत्री गिरीश महाजन यांचे उपस्थितीत कार्यक्रम होतात., शेंदुर्णि येथील राममंदिर, नासिक येथील काळाराम मंदिर, पुण्याच्या तुळशीबागेतील पेशवेकालीन राममंदिर, गोंदवले येथील थोरले व धाकटे राममंदिर , श्री गजानन महाराज संस्थान शेगाव,मुंबई,ठाणे, नागपूर,छ.संभाजी नगर, शिर्डी, आळंदी, अक्कलकोट, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी रामजन्म धूमधडाक्यात साजरा होतो.



सत्संगाचा सुगंध राम,कैवल्याची मुर्ती राम,चराचरातील स्फुर्ती राम,कर्तव्याचे पालन राम,सकल सुखाचा सागर राम,आदर्शाचा आदर्श हा राम,एकवचनी देव महान,अशा अनेक विशेषणांनी प्रभु श्रीरामाचे वर्णन केल आहे. नैतिक, राजकीय -सामाजिक, कोटुंबिक, मर्यादेच उल्लंघन न होऊ न देता पुरूष उत्तम कसा असतो ह्याच उदाहरण म्हणजे "मर्यादा पुरुषोत्तम राम"हे आहे.रामाचे संपूर्ण जीवनच मार्गदर्शक स्त्रोत आहे.एक कोटुंबिक आदर्श आहेत.मातृ-पितृ भक्ति अनुकरणिय आहे.

आजही ग्रामीण भागात एकमेकांशी गाठभेट झाल्यास हात जोडून "रामराम" म्हणायची पद्धत आहे.तो एक संस्कार आहे.चांगल्या राज्याची संकल्पना म्हणून रामराज्य शब्द प्रचलित आहे... रामराज्य येऊन जनता सुखी होईल अशी नेहमीच आपण सर्व अपेक्षा करत असतो... प्रभू श्री रामचंद्र एक आदर्श पुरुष तर होतेच तसेच एक बाणी, एक पत्नी, एक वचनी होते. मातृ-पितृ भक्ती, बंधुप्रेम, सत्य वचन, असे अनेक आदर्श गुण त्यांच्यामध्ये होते. ज्या राज्यातील प्रजा अत्यंत सुखी आणि समाधानी असते अशा आदर्श राज्याला रामराज्य म्हणतात. आपण सगळेच राम राज्याची कल्पना करत असताना या सगळ्या गोष्टी ओघाने लक्षात घ्यायला हव्यात.

भगवान प्रभू रामचंद्र हे केवळ एक धार्मिक व्यक्तिमत्वच नाही तर ते योग्य जीवन जगण्याचे प्रतीक आहेत. त्यांचे जीवन- सत्य, नीतिमत्ता, कर्तव्य, त्याग आणि प्रेम यासारख्या सद्गुणांनी भरलेले होते. आपल्या जीवनात हे गुण आत्मसात करून आपण एक चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करूया. सर्वांना राम नवमीच्या हार्दिक शुभेच्छा.!

रामावर भरवसा असल्याने आपण रामभरवसे शब्दप्रयोग करत असतो...आपल्या प्रत्येकाला आपले जीवन रामाचे चरणी समर्पित व्हावं असेच वाटत असते. संकटे, दुःख दूर होणे साठी, सुखसमृद्धी, मनोकामना पूर्ण होण्यासाठी रामनामाचा जप आपण करा,पण त्याचबरोबर आदर्शांचा आदर्श राम म्हणत असतांना त्याचा काही तरी अंश,गुण आपल्यात उतरायला हवा.तरच्र रामनामाचे जपाचे सार्थक होईल. शेवटी....

"राम नाम उच्चरा जन्माचे सार्थक करा.
नामस्मरणे मुनिजन तरले..
तारक मंत्र जपा..ss
ॐ श्रीराम जय राम जय जय राम...
ॐ श्रीराम जय राम जय जय राम...
आनंदाचा आनंद राम.
श्रीराम जय राम जय जय राम....
त्रिभुवन तारक आहे राम
श्रीराम जय रामजयजयराम...

dilipdeshpande24@gmail.com

> महत्त्वाचे

## फ्लॅट विक्रीच्या आमिषाने २.७४ लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल

**नाशिक ।** गंगापूर रोडवरील एका इमारतीत फ्लॅट विक्रीच्या आमिषाने एकास तब्बल २ लाख ७४ हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, याप्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सतीश अहिरे रा. गंगापूर रोड यांना फ्लॅट घ्यायचा असल्याने त्यांनी किरण चिंचोरे नामक एजंटला संपर्क साधला चिंचोरे याने फिर्यादी यांना विश्वासात घेतले. त्याने मधुबन अपार्टमेंट, गंगापूर रोड येथील सहाव्या मजल्यावरील १२२ नंबरचा फ्लॅट दाखविला. सदर फ्लॅट जितेंद्र जयवंत शिर्के व भाग्यश्री जितेंद्र शिर्के यांच्या मालकीचा असल्याचे सांगण्यात आले. एजंट किरण चिंचोरे याने मालकांनी फ्लॅट विक्रीचे पूर्ण अधिकार आपल्याला दिल्याचे फिर्यादी यांना सांगितले. त्याने फ्लॅट विक्रीसंबंधित कोणतेही कागदपत्र अथवा करारनामा फिर्यादीच्या नावावर केला नाही, तसेच फ्लॅटचे टायटल क्लिअर बाबतचे आवश्यक दस्तावेज दिले नाहीत. याच दरम्यान चिंचोरे आणि शिर्के दांपत्यांनी संगनमत करून प्रशांत गिते यास हाताशी धरून बनावट दस्तऐवज तयार केले. त्याद्वारे फिर्यादीच्या नावावर कर्ज घेऊन मोठ्या प्रमाणावर पैसे उकळले. फिर्यादीकडून इसार व अन्य कागदपत्रांच्या नावाखाली वेळोवेळी एकूण २ लाख ७४ हजार ४९८ रुपये उकळले. या सर्व प्रकारातून फिर्यादीची आर्थिक फसवणूक झाली असून, त्यांनी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्या आधारे वपोनि राजपूत व सपोनि आहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपी विरोधात फसवणूक, अपहार व बनावट दस्तऐवज तयार करण्यासारख्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस पुढील तपास करत असून, आरोपींना अद्याप अटक केलेली नाही. अशा प्रकारे रिअल इस्टेट क्षेत्रातील फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

## नाईक महाविद्यालयात संशोधन पद्धतीवर कार्यशाळा

**नाशिक ।** येथील व्ही.एन.नाईकशिक्षण प्रसारक संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान



महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्यावतीने "संशोधन पद्धती" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. ही कार्यशाळा रसायनशास्त्र विभागाच्या 'केमिस्ट्री क्लब' आणि आय.क्यू.ए.सी विभागाच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.संजय सानप होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून के.टी.एच.एम महाविद्यालयाचे प्रा. डॉ.मिलिंद मेश्राम आणि संगमनेर महाविद्यालयातील प्रा.डॉ. नरेंद्र फटांगरे उपस्थित होते. डॉ. फटांगरे यांनी विद्यार्थ्यांना संशोधनाच्या तंत्र,पद्धती आणि संधी यावर सखोल मार्गदर्शन केले तसच संशोधन प्रक्रियेची मूलभूत तत्त्वे, डेटा संकलन, विश्लेषण तसेच प्रबंध लेखन याविषयी विशेष चर्चा केली. प्राचार्य डॉ.संजय सानप यांनी संशोधनाच्या महत्त्वावर भाष्य करताना विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण दृष्टिकोन स्वीकारावा, असे आवाहन केले. कार्यशाळेत रसायनशास्त्र विभागातील ५५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## गाडगीळ कलादालनात 'आम्ही दोघे ' चित्रप्रदर्शनाला प्रारंभ

**नाशिक ।** छंद जोपासून साधनेने चित्रकलेत पारंगत होता येते हे श्रीखंडे आणि देवकर यांनी सिद्ध केले आहे. कलेची उपासना करुन त्यांनी चित्रप्रदर्शन भरवले. यापुढेही अधिक परिश्रमपूर्वक काम करुन कलेचा आनंद रसिकांना द्यावा, असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रकार प्रा. दीपक वर्मा यांनी केले. संजय श्रीखंडे आणि दीपक देवकर यांच्या कलाकृतींचे 'आम्ही दोघे ' प्रस्तुत चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा प्रारंभ करण्यात आला. त्यांच्या सुंदर कलाकृतींच्या प्रदर्शनाचे नाशिकरोडला स्टारझोन मॉलमध्ये पासपोर्ट ऑफिस शेजारी पु.ना.गाडगीळ अँन्ड सन्सच्या कलादालनात काल शुक्रवारी ( दि.४) या सामूहिक चित्रप्रदर्शनाचे उदघाटन ज्येष्ठ चित्रकार प्रा. दीपक वर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार व कलासमीक्षक संजय देवधर, ज्येष्ठ वास्तू विशारद भालचंद्र चावरे, बिल्डर संदिप ठाकूर, पीएनजीच्या प्रतिनिधी वर्षा भावसार आदी उपस्थित होते.

## तुकाराम कानवडे यांचे निधन

**संगमनेर ।** येथील नगरपालिकेचे सेवानिवृत्त



कर्मचारी तुकाराम दुर्गाजी कानवडे (वय ७५) यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. संगमनेर नगरपालिकेचे कर्मचारी राजेंद्र कानवडे, काँग्रेसचे शहर महासचिव संजय कानवडे, झुंबर वाळुंज, कल्पना शेटे यांचे ते वडील होत.

# वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोरच दोघा पोलीस कर्मचाऱ्यांना जमावाकडून बेदम मारहाण

### इगतपुरी तालुक्यातील घटना; कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर











**नाशिक ।** राज्यात कायदा व सुव्यवस्था ढासाळल्याची परिस्थिती असून, जिथे पोलीसच सुरक्षित नाही तिथे सर्वसामान्यांचे काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे. पोलीस दलाला विचार करण्यासारखी घटना नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात घडली असून, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसमोरच दोघा पोलीस कर्मचाऱ्यांना काही ग्रामस्थांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली.

या ठिकाणी पोलिसांचा फौजफाटा असतानाही दोघा पोलीस कर्मचाऱ्यांचे अक्षरशः कपडे फाडून ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या घटनेबाबत मिळालेली माहिती अशी की, नाशिकच्या इगतपुरी तालुक्यातील भावली धरणानजीक जामुन्डे गावात एका युवकाने झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार मृत युवकाने आत्महत्या केली नसून त्याचा खून झाला आहे. या प्रकरणच्या तपासासाठी गेलेल्या इगतपुरी पोलिठाण्याच्या दोघा पोलीस कर्मचाऱ्यांना ग्रामस्थांनी बेदम मारहाण केली. कृष्णा गोडसे आणि रामदास जाधव अशी मारहाण झालेल्या पोलिस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे या दोघा कर्मचाऱ्यांना ग्रामस्थ मारहाण करीत असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बघ्याची भूमिका घेतल्याने संपूर्ण पोलीस दलात संताप व्यक्त केला जात आहे. या मारहाणीचा एक व्हीडीओ व्हायरल झाला असून, यामध्ये संतप्त जमाव हाताला येईल त्या वस्तूने पोलीस कर्मचाऱ्यांना मारत असल्याचे दिसून येत आहे. जमावाने अक्षरशः कपडे फाडले.

यामध्ये एका कर्मचाऱ्याच्या डोक्यावर बाटली फोडत मारले. या मारहाणीत दोन्ही कर्मचाऱ्यांना गंभीर दुखापत झाली. हा सर्व प्रकार घडत असताना या विभागाचे डीवायएसपी, पोलिस निरीक्षक तसेच अन्य पोलिस कर्मचारी या ठिकाणी उपस्थित होते. आपले सहकारी मार खात असताना त्यांना वाचविण्याऐवजी उपस्थित पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली. ही मारहाण होत असताना पोलिसांकडून कुठलाही प्रतिकार न झाल्याने जमाव अधिकच आक्रमक झाला होता. या घटनेमुळे नाशिक जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनल्याचे स्पष्ट होत आहे. जमावापुढे पोलिसच हतबल झाल्याचे दिसून आले. त्यामुळे जिथे पोलिस सुरक्षित नाही तिथे सर्वसामान्यांचे काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे. अशाप्रकारे एखाद्या गावातील गुन्ह्याचा तपास करणाऱ्या पोलिसांवरच हल्ले होऊ लागले तर पोलिसांनी गुन्ह्याचा तपास कसा करायचा, असाही सवाल उपस्थित केला जात आहे. या प्रकारानंतर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी कुठलीही ठोस भूमिका न घेतल्याने पोलिस दलातील कर्मचाऱ्यांचे मनोबल ढासळण्याची शक्यता आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतच पोलिसांना मार खावा लागत असेल तर गुन्हेगारांचा सामना करायचा कसा? असा सवाल पोलिस कर्मचाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

## मनपाच्या कामकाजाचे ई-ऑफिस प्रणाली प्रशिक्षण





**नाशिक ।** महापालिकेतील ई ऑफिस प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांनी पुढाकार घेतला आहे. शुक्रवारी (दि. ४) मनपाच्या स्थायी समिती सभागृहात कर्मचाऱ्यांसाठी ई ऑफिस कार्यप्रणालीच्या व्यापक प्रशिक्षणाची तयारी करण्यात आली होती. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून पारंपारिक कागदी प्रक्रियेचा वापर कमी करून संगणकीय प्रणालीद्वारे फायलींचा वेगवान, गतिमान व पारदर्शक प्रवास सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

प्रशिक्षण सत्रात डायरेक्टरेट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे चेतन सोंजे यांनी प्रशिक्षण दिले. त्यांनी ई ऑफिस प्रणालीचे महत्त्व, त्याचे फायदे आणि कार्यप्रणाली यांची सखोल माहिती देत कर्मचाऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाचा आत्मसात करण्यास उद्युक्त केले. चेतन सोंजे यांनी असे सांगितले की, "ई ऑफिस प्रणालीमुळे फक्त कागदी प्रवास संपणार नाही तर कारभारात एक नवीन गती आणि कार्यक्षमता येईल." प्रशिक्षण सत्रात उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, माहिती तंत्रज्ञान विभागाचे उपअभियंता नितीन धामणे यांसह इतर मनपाचे खातेप्रमुख यांनी उपस्थित राहून सहभाग घेतला. सर्व उपस्थितांनी प्रशिक्षणाची प्रशंसा केली आणि भविष्यातील ई-कारभाराच्या दृष्टीने ही पावलं अत्यंत महत्वाची ठरणार असल्याचे मत मांडले.

मनपाच्या सर्व अधिकारी कर्मचारी यांना टप्प्याटप्प्याने इ ऑफिस कार्यप्रणालीचे प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती उपायुक्त साताळकर यांनी दिली. हा पुढाकार नाशिक महानगर पालिकेतील पारदर्शक व गतिमान कारभाराच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल असून, नवीन ई ऑफिस प्रणालीद्वारे कार्यप्रवाह अधिक सुलभ, पारदर्शक व जलद होईल. यामुळे पालिकेच्या प्रशासकीय कार्यक्षमतेत सुधारणा होण्यास निश्चितच मदत मिळेल अशी अपेक्षा उपआयुक्त लक्ष्मीकांत साताळकर यांनी व्यक्त केला.

## शहरात तेरा ग्रॅम एमडीसह दोघांना अटक

### गुन्हे शाखा युनिट-२, अंमली पदार्थ विरोधी पथकाची संयुक्त कारवाई

**नाशिक ।** सातत्याने कारवाई होत असूनदेखील शहरात अमली पदार्थांची विक्री राजरोसपणे केली जात आहे. शहरात मेफेड्रॉन (एम.डी.) सारख्या अंमली पदार्थाच्या विक्रीवर अंकुश ठेवण्यासाठी गुन्हे शाखा युनिट-२ व अंमली पदार्थ विरोधी पथकाने संयुक्त कारवाई करण्यात आली.

शुक्रवारी (दि ४) रात्री जनार्दन स्वामी पुला शेजारी, नांदुरनाका-जेलरोड येथे सापळा रचून दोन जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून अंदाजे 65 हजार रुपयांचे १३ ग्रॅम एम.डी.जप्त करण्यात आला. या कारवाईत जय सुनील फिरके (वय २५) रा.



अश्विनी कॉलनी याच्याकडून ८ ग्रॅम तर अंकुश शांताराम चौधरी (वय २४) रा.म्हाडा बिल्डिंग, अश्विनी कॉलनी यांच्याकडून ५ ग्रॅम एम.डी. असा एकूण १३ ग्रॅम मेफेड्रॉन व एक मोबाईल असा एकूण ९५ हजार रुपयांचाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपआयुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव,सहायक आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत सपोनि हेमंत तोडकर, सपोनि डॉ. समाधान हिरे, सपोनि पाटील, पोहवा नितीन फुलमाळी, पोअंमदार प्रवीण वानखेडे व इतर पोलीस कर्मचारी सहभीगी होते.आरोपींविरुद्ध पोहवा नितीन फुलमाळी यांनी आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पुढील कारवाई सुरू आहे.

## चैत्रोत्सवासाठी २५० लालपरी भाविकांच्या सेवेत

**नाशिक ।** वणी सप्तशृंग गडावरील चैत्रोत्सवानिमित्त सप्तशृंगीदेवीचे दर्शन घेण्यासाठी राज्यभरातून लाखोंच्या संख्येने भाविक सप्तशृंगीगडावर येत असतात. या पार्श्वभूमीवर भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी एसटी प्रशासनातर्फे ५ ते १३ एप्रिल या कालावधीत नवीन सीबीएस, मालेगाव, मनमाड, नांदगाव, सटाणा बसस्थानकातून तब्बल २५० जादा बस सोडण्यात येणार आहेत. शहरातील नवीन सीबीएस बसस्थानकातून सप्तशृंगीगडावर जाण्यासाठी ६५ बसेस प्रत्येक १५ मिनिटांच्या वारंवारितेने धावतील. मालेगाव येथून ४५ बसेस दर २० मिनिटांनी, मनमाड येथून १५ बसेस दर ३० मिनिटांनी तर सटाणा येथून ५ बसेस दर एक तासाच्या वारंवारितेने धावतील. एसटी प्रवासी वाहतूक सेवा २४ तास असणार आहे.

## शेतकरी कर्जमाफीच्या मागणीला बळ; नाशिकमध्ये शेतकरी संघटनेची बैठक

**नाशिक ।** गेल्या कृषी हंगामात निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेवटच्या टप्प्यातील अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांवर कर्जबाजारीपणाचे संकट आणखी गडद झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे जीवन सावरण्यासाठी कर्जमाफी हा पर्याय ठरू शकतो, अशी जोरदार मागणी शेतकरी संघटनांनी केली आहे.



नाशिक येथील हुतात्मा स्मारक येथे शरद जोशी प्रेरित शेतकरी संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी मार्गदर्शक शंकर ढिकले, शैलेंद्र कापडणीस, डॉ. जाधव, सोपान कडलग, बाळू नाठे, सुनील बिरारी, संदीप सोनवणे, संधान सर, शांताराम माळुदे, लक्ष्मण मते, कचरू बागुल, दत्तात्रेय कडलग यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि शेतकरी उपस्थित होते. बैठकीत बोलताना सोपान कडलग यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, हवामान बदलामुळे पिकांचे झालेले नुकसान ही सरकारसाठी एक चेतावणी आहे. अशा वेळी केवळ नुकसानभरपाई पुरेशी नाही तर पिकांसाठी घेतलेले कर्ज माफ करणे गरजेचे आहे. 'लाडक्या बहिणी'साठी, मोफत वीज, नामो सन्मान निधीसाठी निधी आहे; पण कर्जमाफीसाठी नाही, असा सरकारचा विरोधाभासी दृष्टिकोन आहे. कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्या करत असून, नुकत्याच एका पुरस्कार प्राप्त शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना ही या मागणीला अधिक तीव्रता देणारी आहे. शेतकरी आंदोलन सध्या सरकारसाठी योग्य नाही, याची जाणीव असल्यामुळे लवकरच योग्य तो निर्णय अपेक्षित असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

बैठकीत अनेक शेतकऱ्यांनी संघटनेत प्रवेश केला. त्यांना शेतकरी संघटनेचा अधिकृत बिल्ला लावून स्वागत करण्यात आले. एसबीआयच्या अहवालानुसार, २०१४ ते २०२२ या कालावधीत देशातील दहा राज्यांमध्ये कर्जमाफी जाहीर करण्यात आली होती. मात्र केवळ ५० टक्के शेतकऱ्यांनाच त्याचा लाभ मिळाला. याउलट याच काळात केंद्र सरकारने तब्बल १४.५६ लाख कोटी रुपयांचे कॉर्पोरेट कर्ज राइट ऑफ केले. यामुळे सरकारचा शेतकरीविरोधी दृष्टिकोन स्पष्ट होत असल्याचे मत संघटनेने व्यक्त केले. बैठकीच्या अखेरीस शेतकऱ्यांच्या हितासाठी लढा उभारण्याचा आणि सरकारवर दबाव टाकून कर्जमाफी मिळवण्याचा निर्धार करण्यात आला.

## रस्त्याच्या निकृष्ट कामाला नागरिकांचा विरोध

### शिवसेनेचा ठेकेदारांना आणि प्रशासनाला स्पष्ट इशारा

**सिडको ।** प्रभाग २६ परिसरात सध्या सुरू असलेले सिमेंट काँक्रीटचे रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असून, हे काम कोणतीही पूर्वतयारी न करता घाईघाईत केले जात असल्याचा आरोप शिवसेना उपमहानगर प्रमुख सुधाकर जाधव यांनी केला आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांनी नागरिकांना जागरूक राहण्याचे, शासनाच्या निधीचा अपव्यय होऊ न देण्याचे आवाहन केले आहे.

या भागात ठेकेदारांकडून जेसीबी मशिनद्वारे रस्त्यांचे खोदकाम सुरू असून, कोणतीही आवश्यक यंत्रणा उभारण्यात येत नाही. त्यामुळे रस्त्यांच्या खाली असलेल्या ड्रेनेज लाईन, पाण्याच्या पाइपलाइन आणि पावसाळी गटार व्यवस्था याकडे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे. याचा त्रास पुढील काळात नागरिकांनाच सहन करावा लागणार असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

सुधाकर जाधव यांनी सांगितले की, जेसीबी मशिन खोदकाम करण्यासाठी रस्त्यावर उतरवली जात असेल, तर नागरिकांनी पुढील तीन गोष्टींची खात्री केल्याशिवाय खोदकाम करू देऊ नये. ड्रेनेज लाईन टाकण्यात येणार आहे का? पाण्याची लाईन ही ड्रेनेजपासून सुरक्षित अंतरावर नेण्यात येणार आहे का?पावसाळी गटार (स्टॉर्म वॉटर ड्रेनेज) व्यवस्थित बसवण्यात येणार आहे का? या तीनही बाबींची खात्री झाल्यानंतरच जेसीबीने खोदकाम करावे, अन्यथा शासनाच्या निधीचा अपव्यय होतो आणि जनतेचा पैसाही वाया जातो, असे ते म्हणाले. स्वामी समर्थ केंद्र परिसरात याआधी झालेलं निकृष्ट काम हे याचच उदाहरण असल्याचे जाधव यांनी सांगितले. त्या परिसरात रस्त्याचे काँक्रीटीकरण पूर्ण झाल्यानंतर काहीच दिवसांत ते उखडू लागले. त्यामुळं नागरिकांच्या तक्रारी वाढल्या असून, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. सध्या नाशिक महानगरपालिकेवर प्रशासकीय राजवट आहे आणि या कालावधीत दर्जेदार कामांची हमी मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. फक्त वरवर काँक्रीट टाकून रस्त्यांचे काम पूर्ण केल्याचे दाखवले जात आहे. वास्तविक, त्यामागे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार लपलेला आहे. असा आरोपही त्यांनी केला. सुधाकर जाधव यांनी नागरिकांना आवाहन करत सांगितले की, जर काम दर्जेदार असेल, तरच त्याला सहकार्य करा. अन्यथा एकजूट होऊन अशा निकृष्ट आणि अपूर्ण कामांना विरोध करा. या पार्श्वभूमीवर कॉलनी रोड परिसरातील नागरिकांत असंतोष वाढताना दिसत असून, अनेकांनी सोशल मीडियावरही आपली नाराजी व्यक्त केली आहे. रस्त्यांच्या गुणवत्तेचा मुद्दा नाशिक शहरासाठी नवखा नाही, पण नागरिक जर सजग राहिले तरच निधीचा योग्य वापर होईल, असं त्याचं म्हणणं आहे.



# वाढती इंधनगरज हा अर्थव्यवस्थेला धक्का...

**परामर्श**

**हेमंत देसाई**, ज्येष्ठ पत्रकार



भारताची पेट्रोलियम उत्पादनांची मागणी वाढून आता आपल्याला ८८ टक्के कच्चे तेल आयात करावे लागत आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत ती अर्ध्या टक्क्याने वाढली आहे. पाच वर्षांपूर्वी आपल्याला ८३-८४ टक्के तेल बाहेरील देशांमधून आणावे लागत होते. मात्र आज भारतात विकास प्रक्रिया वेगवान झाली असल्यामुळे, ठिकठिकाणी नवनवीन कारखाने आणि प्रकल्प उभे राहत आहेत. रस्ते, इमारती, धरणे, पूल, शेती या सर्व क्षेत्रांमध्ये इंधनाची गरज असते. इंधनाशिवाय अर्थव्यवस्थेचे चक्र फिरू शकत नाही. २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कच्च्या तेलाबाबत भारताला स्वयंपूर्णता प्राप्त करण्याच्या दिशेने आम्ही झटू, अशी घोषणा केली होती. प्रत्यक्षात भारताचे परावलंबित्व वाढतच चालले आहे. त्यामुळे तेलाच्या जागतिक बाजारभावात चढ-उतार झाल्यास आपल्या अर्थव्यवस्थेस अधिकाधिक फटका बसू लागला आहे. तेलाच्या वाढत्या आयातीमुळे व्यापारी तुटीत भर पडत आहे. परदेशी चलनसाठ्याला गळती लागली असून डॉलरच्या तुलनेत रुपया घसरू लागला आहे. या खेरीज तेलाचे भाव वधारल्यास महागाई वाढते, ती वेगळीच. सध्या कच्च्या तेलाचे दर ७२ ते ७३ डॉलर प्रति बॅरलच्या दरम्यान आहेत. २०२२ पर्यंत तेलाची आयात एकूण मागणीच्या तुलनेत ६७ टक्के होईल, अशी गर्जना करण्यात आली होती. प्रत्यक्षात आयात वाढत आहे. भारताच्या तेल आणि वायूच्या उत्खननासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज आहे. त्यासाठी संबंधित धोरणामध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच तेल क्षेत्र नियंत्रक आणि विकास दुरुस्ती विधेयक संसदेत मंजूर करण्यात आले. इलेक्ट्रिक मोबिलिटी, जैव इंधने आणि अन्य पर्यायी इंधनांना सरकार प्रोत्साहन देत आहे. परंतु इंधनाच्या वाढत्या मागणीच्या तुलनेत हे प्रयत्न अपुरे आहेत.

फेब्रुवारी २०२५ अखेरपर्यंत भारताच्या कच्च्या तेलाची आयात २१ कोटी ३४ लाख मेट्रिक टनांवरून २१ कोटी ९९ लाख मेट्रिक टनांपर्यंत वाढली आहे. त्या तुलनेत देशांतर्गत तेलाचे दोन कोटी ६९ लक्ष टनाचे उत्पादन आता २ कोटी ६२ लक्ष टनांवर आले आहे. पेट्रोलियम उत्पादनांच्या मागणीत मात्र अडीच टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. जगामध्ये कच्च्या तेलाची सर्वाधिक मागणी असलेल्या देशांमध्ये भारताचा तिसरा क्रमांक आहे. कच्च्या तेलाच्या आयातीवरील खर्चातही यंदा तीन टक्क्यांनी वाढ झाली असून गेल्या ११ महिन्यांमध्ये जवळपास १२५ अब्ज डॉलर इतका खर्च आपण आयातीवरच केला आहे. आगामी वर्षात कच्च्या तेलाच्या मागणीत आणखी किमान दीड टक्के तरी वाढ होईल, असा अंदाज आहे. भारताची तेल शुद्धीकरण क्षमता वर्षाला २५ कोटी टन इतकी आहे. आपण आशियाई तसेच आफ्रिकेतील अनेक देशांना तेल शुद्ध करून पाठवतो. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाबरोबरच्या तेल व्यापारावर बंधने लागू केली आहेत. भारत आपल्या गरजेच्या तुलनेत रशियाकडून पूर्वी ३३ टक्के तेल आयात करत होता. आता त्याचे प्रमाण ३५ टक्क्यांवर गेले आहे. रशियाकडून कच्च्या तेलाच्या उपलब्धतेत वाढदेखील झाली आहे. रशियातील तेलाची मागणीही कमी झाली आहे. सध्या भारत रशियाकडून दररोज सुमारे १८ कोटी ५० लाख बॅरल इतके तेल आयात करत आहे. भारताप्रमाणे चीनही रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल घेत आहे. रशियाचे तेल बॅरलला ६० डॉलर किंवा त्याहीखाली गेल्यामुळे आपल्याला स्वस्तात उपलब्ध होत आहे.

लोकसभा निवडणुका जाहीर होण्यापूर्वी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी दोन रुपयांनी कपात करण्यात आल्यामुळे खनिज तेलाच्या स्थिरावलेल्या आयात किमतीचा फायदा इंडियन ऑइलला मिळू शकला नव्हता. इंडियन ऑइल हे केवळ एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. मुळात भारत सरकार आत्मनिर्भरतेच्या कितीही बाता मारत असले, तरी तेलासाठी विदेशावर असलेले आपले अवलंबित्व वाढतच चालले आहे. त्याच वेळी सार्वजनिक तेल कंपन्यांची परिस्थिती खालावली, तर ती अधिक चिंतेची बाब म्हणावी लागेल. गेल्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीमध्ये नैसर्गिक वायू आयात करण्याचे प्रमाण पाच टक्क्यांनी वाढून ५१.५ टक्क्यांवर गेले. आपल्याला अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरची करायची असल्यामुळे, अर्थातच भविष्यकाळात भारताची ऊर्जेची गरज वाढत जाणार आहे. जागतिक बाजारपेठेत तेलाचे भाव भडकतात, तेव्हा आपल्या अर्थव्यवस्थेवरील ताण वाढतो. आज ट्रम्प यांनी कॅनडा, मेक्सिको, चीन यांच्याबरोबर व्यापारयुद्ध आरंभले आहे. भारतातून येणाऱ्या आयात मालावरही ते कराची करवत चालवण्याची शक्यता आहे. रशिया-युक्रेन युद्ध थांबलेले नाही. 'हमास'बरोबर झालेल्या शस्त्रसंधीची मुदत संपल्यानंतर इस्रायलने पुन्हा गाझापट्टीमध्ये हल्ले सुरू केले आहेत. त्यामुळे जगात अस्थिरता निर्माण झाली असून कोणत्याही क्षणी तेलाच्या भावाचा भडका उडू शकतो. म्हणूनच भारताला देशांतर्गत कच्च्या तेलाच्या उत्पादनवृद्धीवर अधिक भर द्यावा लागेल.

**देशभरात नवनवीन रस्ते, इमारती, धरणे, पूल उभे रहात असल्याने भारताची पेट्रोलियम उत्पादनांची मागणी वाढली असून आपल्याला ८८ टक्के कच्चे तेल आयात करावे लागत आहे. सत्तेवर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कच्च्या तेलाबाबत स्वयंपूर्णता प्राप्त करण्याच्या दिशेने झटण्याची घोषणा केली होती. प्रत्यक्षात भारताचे परावलंबित्व वाढतच चालले असून अर्थव्यवस्थेला अधिकाधिक फटका बसू लागला आहे.**


आयात केलेल्या कच्च्या तेलाच्या जागी स्वदेशी कच्च्या तेलाच्या वापराचे दोन प्रमुख फायदे आहेत. कमी आयातीचा अर्थ आहे रुपया घसरण्यावर नियंत्रण. अर्थात घरगुती कच्च्या तेलाचे उत्पादन वाढवल्याने प्राप्तिकराच्या रूपात सरकारला अधिक महसूल मिळेल; मात्र किमती कमी करण्यासाठी तेल पुरवठादारांशी तात्कालिक समझोते करावे लागतील आणि रुपयात व्यवहार करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी सरकारच्या पावलावर पाऊल टाकून व्यापाराला उत्तेजन द्यावे लागेल. देशाच्या दीर्घकालीन आर्थिक स्वास्थ्यासाठी हे आवश्यक आहे. कुशल व्यवस्थापन आणि शीघ्र मंजुरी भारताचा तेल शोध आणि उत्पादन क्षेत्रासाठी वैश्विक उत्सुकता निर्माण करू शकतो. तेलाच्या वाढत्या किमती अर्थव्यवस्थेवर उलट परिणाम करू शकतात. सरकारला इंधनाच्या रिफायनरींना अनुदान देण्यास सांगण्याऐवजी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींसाठी करव्यवस्था तर्कसंगत बनवण्याचा विचार केला पाहिजे. आजवर भारत सरकार डिझेल वापरण्यास प्रोत्साहन देत आले आहे. आता त्याचा अधिक प्रमाणात त्रास होत आहे. पेट्रोलच्या तुलनेत डिझेलच्या वाढत्या वापराने भारतातील हवेत अधिक कण आणि अन्य प्रदूषक तत्त्व मिसळतात. त्यामुळे कॅन्सरसारखे आजार वाढत आहेत. लॉजिस्टीक्सशी संबंधित बाबी अंतत: आवश्यक वस्तूंच्या किमती वाढवतात.

अपारंपरिक ऊर्जेला हरित ऊर्जा किंवा अक्षय्य ऊर्जा असेही म्हटले जाते. हरित ऊर्जा हा अक्षय स्रोतांकडून मिळवलेल्या ऊर्जेसाठी वापरला जाणारा शब्द आहे. हरित ऊर्जेला स्वच्छ, शाश्वत किंवा अक्षय ऊर्जा असेही संबोधले जाते. हरित ऊर्जेची निर्मिती होताना आणि इंधन म्हणून तिचा वापर होताना वातावरणात विषारी घटकांचे उत्सर्जन होत नाही किंवा अत्यल्प प्रमाणात होते. त्यामुळे ही ऊर्जा पर्यावरणपूरक मानली जाते. अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील सौर, पवन ऊर्जा आणि बायोगॅससारख्या अक्षय ऊर्जेची क्षमता सोन्याच्या खाणीपेक्षा कमी नाही असे म्हटले आहे. पेट्रोलमध्ये दहा टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट भारताने नियोजित वेळेच्या पाच महिने अगोदर गाठले आहे. ४० टक्के अजीवाश्म इंधन क्षमतेचे उद्दिष्ट नऊ वर्षे आधी गाठले आहे. आता भारताने दर वर्षी पाच दशलक्ष टन ग्रीन हायड्रोजनचे उत्पादन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी राष्ट्रीय हायड्रोजन मिशन अंतर्गत खासगक्षेत्राला १९ हजार कोटी रुपयांचे प्रोत्साहन देण्यात आले आहे. उद्याच्या उज्ज्वल आणि निरामय भविष्यासाठी हरित ऊर्जा हा एक प्रमुख उपाय आहे. याद्वारे २०७० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जनाचे भारताचे उद्दिष्ट देखील पूर्ण केले जाऊ शकते. भारताने २०३० पर्यंत अक्षय ऊर्जा उत्पादनक्षमतेसाठी समोर ठेवलेले लक्ष्य ४५० गीगावॉटपर्यंत वाढवले आहे. हे लक्ष्य २०२२ पर्यंत १७५ गीगावॉट एवढे ठेवण्यात आले होते. जगभरात वाहन आणि औद्योगिक क्षेत्रात वाढलेली ऊर्जेची मागणी जीवाश्म इंधनाचा वापर करून पूर्ण करणे शक्य नाही. हे सर्व लक्षात घेता देशाला कच्च्या इंधनाच्या आयातीकडे गांभिर्याने पहावे लागणार आहे.

# अंजन घालणारा शेतीविषयक अहवाल

**मागोवा**

**महेश जोशी**




गेल्या काही वर्षांपासून शेतकरी शेतीमालाच्या दरासाठी आंदोलन करत आहेत. त्यांच्या आंदोलनात फूट पाडल्यामुळे शेतकऱ्यांच्या आंदोलनातून हाती काहीच लागले नाही. गेल्या आठवड्यात टोमॅटोला दोन रुपये किलो भाव होता. मेथीच्या दोन जुड्या १५ रुपयांना मिळत होत्या. कलिंगड दहा रुपयांना मिळत होते. कोबी, फ्लॉवरमध्ये तर शेतकऱ्यांनी नांगर घातला होता. कांदाही शंभर रुपयांना पाच किलो दरापर्यंत पोहोचला. अशा परिस्थितीत शेती करायची तरी कशासाठी, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडतो. बुलडाण्याच्या एका शेतकऱ्याला राज्य सरकारचा कृषी सन्मान पुरस्कार मिळाला. मात्र शेतीला पाणी मिळत नसल्याने त्याने आत्महत्या केली. वाशिम येथे पिकांना भाव मिळत नसल्याने कर्ज फेडता येत नाही, म्हणून एका शेतकऱ्याने अवयव विकायला काढले. शेतीची अवस्था अशी असली तरी देशात सर्वाधिक रोजगार शेतीक्षेत्रच देते, ही वस्तुस्थिती आहे. कोरोना साथीच्या काळात शेती या एकमेव क्षेत्राने वाढ नोंदवली. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवालातही उद्योग आणि सेवाक्षेत्राने निराशा केली असताना शेतीच्या विकासाच्या दुप्पट दराने राज्याला हात दिला. अर्थात, अलिकडच्या इतिहासात प्रथमच शेती आणि शेतकरी हे राष्ट्रीय चर्चेचा विषय झाले आहेत. देशातील प्रत्येक चौथा मतदार आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी आहे. भारताच्या शेती व्यवसायाचे पुनरुज्जीवन करणे, हा देशाचा प्रमुख अजेंडा आहे यात काही शंका नाही; परंतु या क्षेत्राबद्दल आपण जसजसे अधिक बोलतो तसे आपल्याला त्यामध्ये अधिक समस्या अडचणी आढळतात.

२०११ च्या जनगणनेनुसार देशात दररोज दोन हजार शेतकऱ्यांनी शेती सोडली असून शेतकरी वर्गातील तरुणांना शेतीमध्ये फारच कमी रस आहे. कृषी विद्यापीठांमधून पदवी घेणारे बहुसंख्य विद्यार्थीसुद्धा इतर व्यवसायांमध्ये कारकिर्द करताना दिसतात. कृषी अर्थव्यवस्था तीव्र संकटात असते, तेव्हा शेती आणि बिगर कृषी कामगारांवरही त्याचे वाईट परिणाम होत असतात. दिल्ली येथील 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी ('सीएमआयआयई') या संस्थेच्या अहवालात म्हटले आहे, की २०१८- १९ मध्ये शेतीचे एकूण मूल्य गेल्या १४ वर्षांमध्ये सर्वात कमी आहे. २०१८-१९ मध्ये ग्रामीण भारतात अंदाजे ९१ लाख आणि शहरी भारतातील १८ लाख लोकांनी रोजगार गमावले. अहवालात म्हटले आहे की देशातील एकूण लोकसंख्येपैकी दोन तृतीयांश जनता ग्रामीण भागात रहाते; परंतु त्यातील ८४ टक्के लोकांनी रोजगार गमावले आहेत. यापूर्वी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाच्या जाहीर नियतकालिक कामगार श्रम सर्वेक्षण, २०१७-१८ च्या अहवालात हे दिसून आले. २०११ -१२ ते २०१७-१८ दरम्यान ग्रामीण भागातील सुमारे ३.४ कोटी शेतमजुरांनी आपला रोजगार गमावला आहे. त्यामुळे शेतमजुराच्या कार्यशक्तीमध्ये ४० टक्क्यांनी घट झाली. २००१ ते २०११ च्या जनगणनेनुसार शहरांची घनता १३६२ वरून ३८९४ वर गेली आहे. हे सूचित करते की ग्रामीण भागातील लोक शेती सोडत आहेत किंवा बिगर शेतीविषयक जीवनाला प्राधान्य देत आहेत.


२०११ च्या जनगणनेमुळे इतिहासात प्रथमच ग्रामीण भागातील लोकसंख्यावाढीची नोंद झाली असून बरेच शेतकरी अल्पभूधारक असूनही शेती करत नसल्याचे संकेत मिळत आहेत. हे देखील दर्शवते की भारत मोठ्या बदलाच्या मार्गावर आहे. आपण आर्थिक बाबी आणि रोजगाराच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास ग्रामीण भारत आता शेतीप्रधान नाही. भारत एक बिगर शेतीप्रधान अर्थव्यवस्थेचा देश बनत आहे. शेतकरी शेती सोडत आहेत आणि बिगरशेती रोजगारामध्ये जात आहेत. त्यांनी हा निर्णय आर्थिक कारणांपायी घेतला आहे. कारण शेतीपेक्षा इतर पर्यायांमधून ते अधिक पैसे कमावतात. शेतकऱ्यांचे उत्पन्न बिगर शेतकऱ्याच्या तुलनेत सुमारे पंचवीस टक्के आहे. शेतीशी निगडित राज्यांमध्ये तरुण लोकसंख्या शेतीपेक्षा वैकल्पिक उदरनिर्वाहाचे स्त्रोत शोधत आहे. आफ्रिकी देशांच्या तुलनेत भारतात बिगरशेती रोजगाराची पातळी खूपच जास्त आहे. भारतीय पर्यावरण मंत्रालयाच्या अहवालानुसार २०१९ मध्ये ५,९५७ शेतकरी आणि ४,३२४ शेतमजुरांनी आत्महत्या केली. २०१८ मध्ये ही आकडेवारी अनुक्रमे ५,७६३ आणि ४,५८६ होती. २०१९ ते २०२० या काळात नऊ राज्यांमध्ये शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. ही नऊ राज्ये म्हणजे आंध्र प्रदेश, आसाम, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, मिझोरम, पंजाब, उत्तर प्रदेश आणि अंदमान निकोबार बेटे.


'नॅशनल क्राइम रेकॉर्डस ब्यूरो' शेतकरी आत्महत्यांबद्दल गप्प आहे, तर २०१६-२०१७ मधील शासनाच्या अहवालात त्यामागील तीन कारणे दिली गेली आहेत. अनियमित मॉन्सूनमुळे होणारे पिकांचे नुकसान, सिंचनासाठी पाण्याचा निश्चित पुरवठा नसणे आणि पिकावरील किडींचे आणि इतर रोगांचे आक्रमण ही ती तीन कारणे. बाजारपेठत शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. शेतीतून शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ मिळत नाही. त्यामुळे शेती फायद्याची होत नाही. तसेच, बियाण्यापासून पाणी आणि मजुरीपर्यंतचा खर्च वाढत आहे. हवामान बदलामुळे शेती अव्यवहार्य होत आहे. पीक महाग होते, तेव्हा परदेशातून स्वस्त धान्य आयात केले जाते. त्यामुळे आमचे शेतकरी दोन्ही बाजूंनी त्रस्त आहेत. म्हणूनच किमान आधारभूत किंमतीची (एमएसपी) मागणी होत आहे, जेणेकरुन किंमती बदलूनही ते सुरक्षित राहू शकतील. सध्याची एमएसपी यंत्रणा सदोष आहे. सरकारच्याच आकडेवारीवरून दिसून आले आहे की सहाशे घाऊक बाजारात निवडलेल्या दहा पिकांच्या व्यवहारांपैकी जवळपास ७० टक्के व्यवहार 'एमएसपी'पेक्षा कमी किंमतीत झाले आहेत. नव्याने आलेला अहवाल कृषिप्रधान देशातील शेतकरी शेती सोडत असल्याचा उल्लेख करतो. अर्थात आतबट्टयाची शेती नको, असे वाटून शेती सोडणाऱ्यांची संख्या प्रथमच वाढते आहे, असे नाही. भारत हा शेती करणारा जगातील सर्वात मोठा देश आहे. येथील सुमारे ५५ टक्के लोक शेती करून आपले घर चालवतात.

२०२२-२३ मध्ये भारतातील धान्य उत्पादन ३३०.५ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचले होते. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा धान्य, फळे आणि भाजीपाला उत्पादक आणि साखर निर्यात करणारा देश आहे; परंतु बहुतांश शेतकऱ्यांसाठी शेती हा आता फायदेशीर व्यवहार राहिलेला नाही. कमी उत्पन्न असलेल्या शेतकऱ्यांचे भविष्य अनिश्चित आहे. शेतकऱ्यांना उत्पादन, उत्पन्न आणि मजुरी या सर्वच समस्यांना तोंड द्यावे लागते. देशाच्या जीडीपीमध्ये शेतीचे योगदान १८ टक्क्यांपर्यंत घसरले आहे तर अर्ध्याहून अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. सरकारने संसदेत विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की किती शेतकऱ्यांनी शेती सोडली याचा विशेष आढावा घेण्यात आलेला नाही. तथापि, जनगणना विभागाकडून दर दहा वर्षांनी करण्यात येणाऱ्या जनगणनेनुसार, २००१ मध्ये देशात १२.७३ कोटी शेतकरी होते. ते २०११ मध्ये ११.८८ कोटींवर आले. म्हणजेच दहा वर्षांमध्ये शेतकऱ्यांची संख्या ६.६७ टक्क्यांनी कमी झाली आहे. सरकारने सांगितले की हा बदल असामान्य नाही. जगभरातील विकसनशील देशांमध्ये लोक शेती सोडून उद्योग आणि सेवा क्षेत्रातील रोजगाराकडे वळतात, असे दिसून आले आहे. भारतातही तेच होत आहे. शेतकरी कोणते पीक घेणार हे अनेक गोष्टींवर अवलंबून असते. त्यात हवामान काय आहे, कोणत्या पिकाला बाजारात चांगला भाव मिळत आहे आणि त्यांच्याकडे कोणती संसाधने उपलब्ध आहेत, हे पाहिले जाते.

कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग २०१४-१५ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियानांतर्गत कापूस, ताग आणि ऊस यासारख्या व्यावसायिक पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देत आहे. २००१ ते २०११ या काळात सुमारे ८५ लाख शेतकऱ्यांनी शेती सोडली. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या खऱ्या प्रश्नांना सरकारी अहवालात स्थान का मिळत नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहरीकरण आणि इतर क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या वाढत्या संधींमुळे शेतकरी शेती सोडून जात असल्याचे सरकारच्या अहवालात म्हटले आहे; पण वास्तव यापेक्षा खूप वेगळे आहे. शेतीतून मिळणारे उत्पन्न इतके कमी आहे की शेतकरी त्यावर जगू शकत नाहीत. कर्जबाजारीपणामुळे दर वर्षी हजारो शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत आहे. शेतकरी रात्रंदिवस काबाडकष्ट करतात; मात्र बाजारपेठेतील मध्यस्थांमुळे त्यांच्या पिकांना योग्य भाव मिळत नाही. बियाणे, खते, डिझेल, ट्रॅक्टर सर्व काही महाग होत आहे. त्यामुळे खर्च वाढत आहेत. पावसाची अनियमितता, दुष्काळ, पूर आणि वाढते तापमान यामुळे शेती करणे कठीण झाले आहे. सरकार शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या कमी करण्याचा प्रयत्न करू शकते; परंतु ते परिस्थिती हाताळण्यात अयशस्वी झाल्याचे दिसते.

**निवडणुकीच्या प्रचारात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन द्यायचे आणि निवडून आल्यानंतर आर्थिक कारणे सांगून माघार घ्यायची, हे पटत नाही. कृषी अर्थव्यवस्था तीव्र संकटात असते, तेव्हा शेती आणि बिगर कृषी कामगारांवरही त्याचे वाईट परिणाम होत असतात. दिल्ली येथील 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी या संस्थेच्या अहवालानुसार शेतीचे एकूण मूल्य सातत्याने ढासळत आहे. या आव्हानाचा खास वेध.**






# अमेरिकेचे टॅरिफ

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी रात्री उशिरा भारतावर २६% कर (परस्पर म्हणजेच टिट फॉर टॅट टॅरिफ) लादण्याची घोषणा केली. ट्रम्प म्हणाले, भारत खूप कडक आहे. मोदी माझे चांगले मित्र आहेत, पण ते आमच्याशी योग्य वागणूक देत नाहीत.

भारत अमेरिकेवर ५२% पर्यंत कर लादतो, म्हणून अमेरिका भारतावर २६% कर लादेल. इतर देश आमच्याकडून जे शुल्क आकारत आहेत त्याच्या जवळपास निम्मे शुल्क आम्ही आकारू. त्यामुळे दर पूर्णपणे परस्परसंवादी नसतील. मी ते करू शकतो, पण ते अनेक देशांसाठी कठीण होईल. आम्हाला हे करायचे नव्हते.

भारताव्यतिरिक्त, चीनवर ३४%, युरोपियन युनियनवर २०%, दक्षिण कोरियावर २५%, जपानवर २४%, व्हिएतनामवर ४६% आणि तैवानवर ३२% शुल्क आकारले जाईल. अमेरिकेने सुमारे ६० देशांवर त्यांच्या करांच्या तुलनेत निम्मा कर लादण्याचा निर्णय घेतला आहे.

याशिवाय, इतर देशांमधून अमेरिकेत येणाऱ्या सर्व वस्तूंवर १०% बेसलाइन (किमान) शुल्क आकारले जाईल. बेसलाइन टॅरिफ ५ एप्रिल रोजी लागू होईल आणि परस्पर टॅरिफ ९ एप्रिल रोजी मध्यरात्री १२ वाजल्यानंतर लागू होईल. व्यापाराच्या सामान्य नियमांनुसार आयातीवर बेसलाइन टॅरिफ लादला जातो, तर परस्पर टॅरिफ दुसऱ्या देशाने लादलेल्या टॅरिफला प्रतिसाद म्हणून लादला जातो.

अमेरिका परदेशात उत्पादित होणाऱ्या वाहनांवर २५% कर लादणार आहे. आतापर्यंत, अमेरिका इतर देशांमधून येणाऱ्या मोटारसायकलींवर फक्त २.४% कर आकारत होती. भारत ६०%, व्हिएतनाम ७०% आणि इतर देश त्याहूनही जास्त शुल्क आकारत आहेत. त्यांनी ५० वर्षे अमेरिकेला लुटले, पण आज ते संपत आहे, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले.

अमेरिका जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा श्रीमंत असेल. आज आपण अमेरिकन कामगारांच्या बाजूने उभे आहोत. आम्ही अखेर अमेरिका फर्स्टची अंमलबजावणी करत आहोत. आपण खरोखर खूप श्रीमंत होऊ शकतो. आपण इतके श्रीमंत असू शकतो की ते अविश्वसनीय वाटेल, पण आता आपण हुशार होत आहोत, असे त्यांनी निक्षून सांगितले.

ट्रम्प पुढे म्हणतात, टॅरिफच्या बाबतीत अमेरिका आता समान प्रतिसाद देईल. ज्या देशांना अमेरिकन बाजारपेठेत प्रवेश हवा आहे त्यांना त्याची किंमत मोजावी लागेल. जर कोणत्याही कंपनीला टॅरिफमधून सूट हवी असेल तर तिला अमेरिकेत आपले उत्पादन करावे लागेल. टॅरिफमुळे अमेरिकेची वाढ होण्यास मदत होईल.

अनेक देशांनी अमेरिकन बाजारपेठेचा फायदा घेऊन स्वतःला श्रीमंत बनवले, परंतु नंतर अमेरिकन वस्तूंसाठी स्वतःच्या बाजारपेठांवर निर्बंध लादले. आता अमेरिका स्वतःच्या फायद्यांचाही विचार करेल. आता अमेरिकेत नोकऱ्या आणि कारखाने परत येतील. कॅनडाचे दुग्धजन्य पदार्थांचे दर आपल्या शेतकऱ्यांसाठी योग्य नाहीत. कॅनडा आणि मेक्सिको सारख्या देशांना त्यांचे उद्योग टिकवून ठेवण्यासाठी अमेरिका अनुदान देते.

ट्रम्प यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, आज अमेरिकेसाठी आर्थिक स्वातंत्र्याचा दिवस आहे. आपल्याला अमेरिकेला पुन्हा महान बनवायचे आहे. आम्ही परस्पर शुल्क जाहीर करत आहोत, म्हणजेच देश आपल्यावर जे काही शुल्क लादत आहे, तेच आम्ही त्यांच्याशी करू.

ट्रम्प यांच्या परस्पर करांच्या घोषणेवर लक्ष ठेवण्यासाठी भारत सरकारने नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. नियंत्रण कक्षात वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे अधिकारी उपस्थित होते. सर्व अधिकाऱ्यांनी अमेरिकेच्या कर आकारणीचा भारताच्या व्यापारावर होणाऱ्या संभाव्य परिणामाचे मूल्यांकन केले.

टॅरिफ हा एक प्रकारचा सीमा शुल्क किंवा कर आहे, जो कोणताही देश परदेशातून येणाऱ्या वस्तूंवर लादतो. हा कर आयात करणाऱ्या कंपनीवर आकारला जातो. हे वाढवून किंवा कमी करून देश आपापसातील व्यापार नियंत्रित करतात.

मार्चमध्ये, अमेरिकन संसदेच्या संयुक्त अधिवेशनात ट्रम्प म्हणाले होते, भारत आमच्याकडून १००% पेक्षा जास्त शुल्क आकारतो, आम्हीही पुढील महिन्यापासून तेच करणार आहोत. त्यांनी घोषणा केली की त्यांच्या प्रशासनात, जर कोणत्याही कंपनीने अमेरिकेत आपले उत्पादन तयार केले नाही तर त्यांना शुल्क भरावे लागेल. काही प्रकरणांमध्ये, हे शुल्क खूप जास्त असेल.

ते म्हणाले की इतर देश अमेरिकेवर मोठे कर आणि जकात लादतात, तर अमेरिका त्यांच्यावर फारच कमी कर लादते. हे खूप अन्याय्य आहे. इतर देश गेल्या अनेक दशकांपासून आपल्यावर कर लादत आहेत, आता आपली पाळी आहे.

ट्रम्प यांनी ५ मार्च रोजी अमेरिकन संसदेच्या संयुक्त अधिवेशनात या शुल्काची घोषणा केली. ट्रम्प म्हणाले की, २ एप्रिलपासून अमेरिकेत 'रेसिप्रोकल टॅरिफ' लागू होईल. याचा अर्थ असा की ते आपल्यावर जे काही टॅरिफ लावतील, ते आम्ही त्यांच्यावरही लादू. ट्रम्प हसले आणि म्हणाले, 'मला ते १ एप्रिल रोजी लागू करायचे होते, पण तेव्हा लोकांना वाटले असते की हा 'एप्रिल फूल डे' आहे.'

७ मार्च रोजी शुल्काची घोषणा केल्यानंतर ट्रम्प म्हणाले होते की भारत आमच्याकडून खूप जास्त शुल्क आकारतो. तुम्ही भारतात काहीही विकू शकत नाही. तथापि, भारत आता त्यांचे शुल्क मोठ्या प्रमाणात कमी करू इच्छित आहे कारण आम्ही त्यांचे गैरकृत्ये उघड करत आहोत.

ते म्हणाले, सर्वांनी आपला देश लुटला आहे, पण आता तो थांबला आहे. माझ्या पहिल्या सत्रात मी ते बंद केले होते. आता आपण हे पूर्णपणे थांबवणार आहोत, कारण हे खूप चुकीचे आहे. आर्थिक, आर्थिक आणि व्यापारी दृष्टिकोनातून जगातील जवळजवळ प्रत्येक देशाने अमेरिकेला लुटले आहे.

दरम्यान, ट्रम्प यांनी दावा केला की भारताने अमेरिकन उत्पादनांवरील कर मोठ्या प्रमाणात कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. ते म्हणाले की अनेक देश त्यांचे शुल्क कमी करतील कारण त्यांना जाणीव आहे की ते अमेरिकेसोबत चुकीचे वागले आहेत. युरोपियन युनियनने आधीच त्यांचे कर २.५% पर्यंत कमी केले आहेत. मला अलिकडेच कळले की भारतही आपले शुल्क लक्षणीयरीत्या कमी करणार आहे. ट्रम्पच्या या निर्णयाविरुद्ध चीन, जपान आणि दक्षिण कोरिया एकत्र आले आहेत. चीनच्या सरकारी माध्यम सीसीटीसीशी जोडलेल्या एका सोशल मीडिया अकाउंटने केलेल्या पोस्टमध्ये हा दावा करण्यात आला आहे.

रविवारी (३० मार्च) चीन, जपान आणि दक्षिण कोरियाच्या व्यापार मंत्र्यांनी अमेरिकेच्या शुल्काबाबत बैठक घेतली. पाच वर्षांनंतर रविवारी चीन, जपान आणि दक्षिण कोरियाने आर्थिक चर्चा केली. ट्रम्प यांनी अतिरिक्त शुल्काची घोषणा केल्यानंतरही हे तिन्ही आशियाई देश परस्पर व्यापाराला चालना देतील, असा निर्णय या चर्चेदरम्यान घेण्यात आला. याशिवाय, तिन्ही देशांच्या व्यापार मंत्र्यांनी आपापसात मुक्त व्यापार करार होण्याची शक्यताही व्यक्त केली आहे.

सुमारे तीन आठवड्यांपूर्वी ट्रम्प यांनी भारताबद्दल असाच दावा केला होता. तेव्हा भारत सरकारने हा दावा फेटाळून लावला होता. भारताचे वाणिज्य सचिव सुनील बर्थवाल यांनी संसदीय समितीला सांगितले होते की, भारताने अमेरिकेसोबत कर कमी करण्याचे कोणतेही आश्वासन दिलेले नाही.

परराष्ट्र व्यवहारांवरील संसदीय समितीला माहिती देताना सुनील बर्थवाल यांनी त्यावेळी स्पष्ट केले होते की भारत आणि अमेरिका यांच्यात अजूनही चर्चा सुरू आहे आणि अद्याप कोणताही व्यापार करार अंतिम झालेला नाही. बर्थवाल म्हणाले की, अमेरिकन राष्ट्राध्यक्षांचे दावे आणि मीडिया रिपोर्ट्सवर विश्वास ठेवता येत नाही. कोणत्याही व्यापार वाटाघाटींमध्ये भारताचे हित पूर्णपणे विचारात घेतले जाईल.

ट्रम्प यांच्या २६% टॅरिफनुसार शेतकरी आणि कारागीर यांच्यावर काय परिणाम होतील? काय स्वस्त किंवा महाग होईल? भारत याला कसे सामोरे जाईल? असे काही प्रश्न निर्माण झाले आहेत. आता भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या वस्तूंवर २६% कर आकारला जाईल.

जेव्हा एखादा देश आयात शुल्क वाढवतो तेव्हा त्याच्या देशांतर्गत बाजारपेठेत परदेशी वस्तू महाग होतात. यामुळे सरकारचे उत्पन्नही वाढते. तसेच, परदेशी वस्तूंचा वापर कमी होतो आणि देशांतर्गत कंपन्यांच्या वस्तूंचा वापर वाढतो. अशाप्रकारे सरकार देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देते.

## टॅरिफ म्हणजे काय...

- टॅरिफ म्हणजे सीमा शुल्क किंवा कर.
- तो परदेशातून येणाऱ्या मालावर लादला जातो.
- त्यामुळे देशांतर्गत बाजारात विदेशी माल महागला.
- दरपत्रकामुळे सरकारचे उत्पन्नही वाढते.
- देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे आणि स्वदेशी उद्योगांचे संरक्षण करणे हा त्याचा उद्देश आहे.

भारत आणि अमेरिका यांच्यात सुमारे ८०० कोटी रुपयांचा कृषी व्यापार आहे. भारत प्रामुख्याने तांदूळ, कोळंबी, मध, वनस्पती अर्क, एरंडेल तेल आणि काळी मिरी अमेरिकेला निर्यात करतो आणि अमेरिका बदाम, अक्रोड, पिस्ता, सफरचंद आणि डाळी पाठवते.

ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्हच्या अहवालानुसार, भारत अमेरिकन कृषी उत्पादनांवर सरासरी ३७.७% शुल्क आकारतो, तर अमेरिकेत भारतीय कृषी उत्पादनांवर तो ५.३% आहे. आता २६% दर असल्याने, भारतीय शेतकऱ्यांवरील भार वाढेल. अमेरिकेत भारतीय कृषी उत्पादने महाग झाल्यामुळे त्यांची मागणी कमी होईल, निर्यात कमी होईल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होईल.

जर अमेरिकेत या सर्व क्षेत्रातील वस्तूंची मागणी कमी झाली तर भारतात त्यांच्या किमती कमी होतील. याचा शेतकरी आणि कामगार यासारख्या या क्षेत्रांशी संबंधित लोकांवर नकारात्मक परिणाम होईल. त्यांचे उत्पन्न कमी होईल आणि रोजगारही कमी होऊ शकतो.

अमेरिकेच्या परस्पर करांचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होईल. भारतावर २६% कर लादल्यामुळे, दरवर्षी सुमारे ६१ हजार कोटी ते ७२ हजार कोटी रुपयांचे नुकसान होऊ शकते. याचे आणखी काही परिणाम दिसून येतात. जसे-

निर्यात महाग होणारः परस्पर शुल्कामुळे अन्न उत्पादने, कापड, विद्युत यंत्रसामग्री, रत्ने आणि दागिने, औषधे आणि ऑटोमोबाईल्स यासारख्या अनेक वस्तू महाग होऊ शकतात.

व्यापार अधिशेष कमी होईलः सध्या अमेरिका भारतीय वस्तूंवर कमी शुल्क लादते, ज्यामुळे भारताला व्यापार अधिशेषाचा फायदा मिळतो. शुल्क वाढल्याने भारताचे मोठे नुकसान होईल.

रुपया कमकुवत होतोः अधिक आयात म्हणजे डॉलरची मागणी वाढणे. यामुळे रुपया कमकुवत होईल आणि डॉलर मजबूत होईल. याचा अर्थ असा की अमेरिकेतून वस्तू खरेदी करण्यासाठी तुम्हाला जास्त पैसे द्यावे लागतील.

आयात वाढेलः जर भारताने अमेरिकेच्या वाढत्या आयाती टाळण्यासाठी अमेरिकन वस्तूंवरील आयात शुल्क कमी केले तर भारतीय बाजारपेठेत अमेरिकन उत्पादने स्वस्त होतील. यामुळे आयात वाढेल.

गेल्या काही दिवसांपासून भारत अमेरिकेतून येणाऱ्या अनेक वस्तूंवरील शुल्क सातत्याने कमी करत आहे. जसे..

अमेरिकेतील १६०० सीसी मोटारसायकलींवरील सीमाशुल्क ५०% वरून ४०% आणि १६०० सीसीपेक्षा जास्त क्षमतेच्या मोटारसायकलींवरील सीमाशुल्क ५०% वरून ३०% पर्यंत कमी करण्यात आले आहे.

अमेरिकन वाइनवरील आयात शुल्क १५०% वरून १००% पर्यंत कमी करण्यात आले.

सिंथेटिक फ्लेवरिंग एसेन्सवरील आयात शुल्क १००% वरून २०% पर्यंत कमी केले.

२६ ते २९ मार्च २०२५ दरम्यान दिल्लीत भारतीय वाणिज्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसह युनायटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह यांच्यात ४ दिवस चर्चा झाली. अमेरिकेला टॅरिफ कमी करण्यास राजी करणे हा यामागील उद्देश आहे. पण, ते तितके सोपे नाही. बघुया, अमेरिका राजी होते का ते ?

• • •

# पानी के पीये बिना, कैसे मिटे पियास...



**हेमकिरण पत्की**

आपलं रोजचं जगणं म्हणजे आत-बाहेरच्या संगतीसोबतचा प्रवास आहे. ही संगत व्यक्तींची, वस्तूंची, वास्तूंची, भवतालातील सृष्टीची आहे. ही संगत अर्थपूर्ण, भावपूर्ण असेल, योग्य अवकाशासह असेल, तर असा प्रवास आनंददायीच असतो. अन्यथा, मनाला ही नुसतीच गर्दी वाटते. अनेकदा कळत - नकळतपणे आपण या गर्दीचे धनी होतो.

हे सारं नीटसं उमगल्यावर आपण बाहेरच्या गर्दीपासून अलिप्त होत जातो, उथळ सहवासापासून वेगळं होत स्वतःच्या मनापाशी पोहोचतो, तेव्हा आपल्याला काय जाणवतं? गंमत वाटेल, पण अशा कृतीनं आपल्याला आपल्या मनाची खरी स्थिती जाणवते. मनातलं इष्ट - अनिष्ट संचित जाणवतं. त्याविषयी आपलं चिंतन घडतं.

आपण कुणाविषयी तरी बाळगलेला द्वेष, शब्दांतून कुणाचा तरी अवमान करून घेतलेलं सुख, एखाद्याच्या माघारी त्याची निंदा करून झालेला क्षणिक संतोष आणि आपण कळत-नकळत केलेल्या आत्मप्रतारणेस बाजूला सारण्याची आपली चतुराई हा असाही त्या स्थितीतील आपल्या मनाचा आशय असतो.

आपण स्वतःशी प्रामाणिक असलो की, हे सारं ध्यानात येतं. आपलं मन व्यर्थ गोष्टी सांभाळून ठेवतंय, हे उमजल्यावर आपल्याला आपल्या हृदयाचं मोल जाणवतं. तरल भावस्थितीत हृदयाचे बोल आठवतात. तिथं एक शांत स्रोत लख्ख दिसतो, जिथं शब्दांहून अधिक नितळ-निर्मळ भाव व्यक्त होत असल्याचं ध्यानात येतं. आपल्या असण्याचं गहिरेपण या हृदयात आहे. हेच तर आपल्या जीवनाचं केंद्र आहे!

कबीर म्हणतात, आपला मी आपल्याला कळत नाही. या मीचं स्वातंत्र्य, अवलंबन, स्वामित्व आणि दास्यत्व कळत नाही. ते साधकाशी कळवळ्याच्या परिभाषेत बोलतात...

दासातन हिरदै नहीं,<br>
नाम धरावे दास।<br>
पानी के पीये बिना,<br>
कैसे मिटे पियास।।

ज्या सद्गुरुंनी उजेडी राहून उजेडाची वाट आपल्याला दाखवलेली असते, त्यांचा दास होण्यात खळखळ कसली? पण, आपण थारा नसलेल्या मनाच्या ताब्यात असतो. या अशा मनाचा दास होणं आपल्याला आवडतं. मनानं निर्माण केलेल्या जगाचा दास होणं आपल्याला रुचतं. म्हणजे असत्चा दास होणं हीच आपली निवड असते.

कबीर सांगतात की, दास्यत्व या नाशवंत जगाचं करायचं की या समग्र अस्तित्वाचं करायचं? याचा विचार साधकाला करावाच लागतो. याचं कारण म्हणजे सद्गुरुच साधकासाठी प्रकट ईश्वरी तत्त्वाचे वाटाडे असतात.

कबीर म्हणतात, नुसत्या मुखानं उच्चारलेलं देवाचं नाम हृदयाशी जोडलेलं नसतं तर मनातून आलेलं असतं. आपलं मन कुठल्याही कामातील कर्तेपण सोडायला तयार नसतं. आतून या मनाला मालकी हक्क हवा असतो आणि म्हणून आपण सद्गुरुंचे दास न होता विषयसुखाचे म्हणजे कांचनकामिनीचे दास होऊन राहतो.

या सत्याचा बोध खरं जगण्याचं कुतूहल असलेल्या तहानल्या जीवाला होतो. देहाचं दास्यत्व परमचेतनेला जाणून शरण गेल्यावरच संपतं. हे एक प्रकारचं स्वामित्व असतं, जे अशा चेतनेला जाणल्यानं सहज लाभतं. साधकाला हे अनुभवातूनच उमजतं.

दास कहावन कठिन है,<br>
मैं दासन का दास।<br>
अब तो ऐसा होय रहूँ,<br>
पांव तले की घास।।

सद्गुरुंचा मी शुद्ध असतो. या मीपणाला अनुसरताना साधकाला आपला मी शुद्ध झाल्याचा भास, भ्रम होऊ शकतो. म्हणूनच सद्गुरुंविषयी साधकाच्या ठायी असलेलं दास्यत्व महत्त्वाचं असल्याचं या दोह्यातून कबीर सुचवतात.

हे दास्यत्व सद्गुरुंच्या पायांखालचं गवत होण्यासारखंच आहे, असं साधकाला हृदयातून वाटणं होय.

सद्गुरुंचा दास म्हणजे काय, हे नीट उमजायला हवं. दास होणं म्हणजे समर्पणातील आत्यंतिकता होय. दास होणं म्हणजे गुलाम होणं नाही. इच्छेविरुद्ध जो समर्पित होऊ पाहतो, तो गुलाम. गुलामी सत्तीतून घडते, परमप्रेमातून नाही. भयानं एखाद्याचा माथा सद्गुरुंच्या चरणावर ठेवला जाईल, पण आत्मा असा कधी झुकतो?

दास्यत्व म्हणजे सद्गुरुंप्रति स्वेच्छेनं केलेलं समर्पण आहे. यात मानसिक दबाव नाही, भय नाही. आनंदात, अहोभावात आपल्या मर्जीनं आणि समग्र संकल्पासह केलेलं समर्पण आहे. कबीरांना या दास्यत्वात साधकाच्या ठायी असलेल्या अहंकाराचं विसर्जन होईल, याचा विश्वास वाटतो. त्यांनी साधकाला घडवलेलं हे दर्शन देहाचा मालक समजणाऱ्या त्याच्यासाठी आरसा होऊ शकतं.

• • •

# ध्येय समतल समाजनिर्मितीचे...

येत्या २५ वर्षांत देशाची स्थिती बदलवण्यासाठी संविधानाला अपेक्षित असा आर्थिक, सामाजिकदृष्ट्या समतल असलेला एकसंध समाज निर्माण करावा लागेल. वाढते सामाजिक, आर्थिक, राजकीय तणाव संविधानिक तरतुदींच्या वापराने कमी करण्याला प्राधान्य दिले, तर देश जागतिक स्तरावरील एक मोठी शक्ती बनू शकतो.

संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पी अधिवेशनात विशेष चर्चा झाली. भारताच्या विशाल लोकसंख्येने उभी केलेली लोकशाही संविधानाच्या भक्कम पायावर गेली ७५ वर्षे टिकून आहे. तथापि, पुढील पंचवीस वर्षांत संविधान आणि लोकशाहीचा प्रवास कसा असावा, यावर व्यापक चर्चा होण्याची गरज आहे.

संविधानाने काय साध्य केले? अलीकडे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संविधान बदलण्याच्या शक्यता चर्चेत येऊ लागल्या आहेत. वास्तविक आपले संविधान तयार करताना अत्यंत व्यापक, सखोल आणि दूरदृष्टीचा विचार करण्यात आला होता.

या संविधानाचा सर्वांत महत्त्वाचा आणि मुख्य उद्देश होता की, पारदर्शक शासनव्यवस्था निर्माण करून त्याद्वारे आर्थिक विषमता विरहित आणि सामाजिक समतायुक्त असा देश उभा करणे, ज्यामध्ये प्रत्येकाला सुखी आणि समृद्ध जीवन जगण्याची संधी उपलब्ध असेल. शिवाय, कोणावरही अन्याय होणार नाही.

गेल्या ७५ वर्षांत संविधानाला अपेक्षित अशी व्यवस्था निर्माण झाली का, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. पण, एका बाबतीत मात्र सर्वांचे एकमत होवू शकते, ते म्हणजे वैविध्यपूर्ण संस्कृती, भाषा, चालीरीती, मतप्रवाह असलेल्या खंडप्राय देशाला या संविधानाने केवळ एकसंधच ठेवलेले नाही, तर शेजारील देशाप्रमाणे हुकूमशाहीकडे झुकूही दिले नाही! पुढच्या पंचवीस वर्षांत किंवा त्यानंतरही संविधानामुळे या गोष्टी अव्याहतपणे सुरू राहाव्यात, अशी अपेक्षा ठेवणे स्वाभाविक असेल.

**संविधानातील सापेक्ष बदल :** आता जगभरात चौथी औद्योगिक क्रांती सुरू झाली आहे. त्यामुळे माणसाच्या जीवनात आजवर न अनुभवलेली स्थित्यंतरे भविष्यात दररोज, अतिवेगाने घडत राहतील. जगाच्या पटलावर विज्ञान-तंत्रज्ञानामध्ये होणारी स्थित्यंतरे तसेच आपल्या देशातील आर्थिक, सामाजिक, राजकीय बदल यांमुळे नव्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि जनतेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक त्या सुधारणा होत राहतील. त्या पार्श्वभूमीवर देशाच्या संविधानात त्या सापेक्ष बदल होणे आवश्यक असेल. अर्थात, गेल्या ७५ वर्षांत संविधानामध्ये १०५ वेळा बदल करण्यात आले आहेत.



**महेश झगडे**

**विषमतेचा विस्तार, लोकशाहीचा संकोचः**

संविधानाच्या बाबतीत दोन महत्त्वाचे पैलू विचारात घ्यावे लागतात. पहिला म्हणजे, संविधानाला ज्या बाबी अपेक्षित केल्या होत्या, त्याप्रमाणे परिपूर्ण शासन आणि समाजव्यवस्था देशात निर्माण झाली आहे की नाही? संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे बहुतांश बाबी घडत असल्या, तरी देशातील आर्थिक आणि सामाजिक विषमता कमी करण्यासाठी संविधान राबवण्याचे प्रयत्न कमी पडले, असे म्हणावे लागेल.

७५ वर्षांत देशात सुबत्ता वाढली, पण आर्थिक विषमता आणि धार्मिक, जातीय तेढ पुन्हा उफाळून येत आहे. उदा. आस्थापनांमध्ये कामगारांचा सहभाग घेणे हा मार्गदर्शक तत्त्वांतील उद्देश अद्याप सफल झालेला नाही. दुसरा म्हणजे, राजकीय व्यवस्था काटेकरपणे चालावी म्हणून जी चौकट संविधानात घालून दिली आहे, ती अनेकदा भेदली जाऊन लोकशाहीविरोधी वातावरण निर्माण झाल्याचा भास होतो.

लोकशाही हा संविधानाचा गाभा आहे. तथापि, तो सुद्धा काही वेळा कमकुवत केला गेल्याचे दिसते. लोकशाहीत प्रत्येक नागरिकाच्या मताप्रमाणे, त्याच्या लोकप्रतिनिधीमार्फत निर्णय व्हावेत अशी अपेक्षा असते. ह्यथ्री लाइनह्ण अशा प्रकारच्या तरतुदीनुसार लोकप्रतिनिधी ज्यांचे प्रतिनिधित्व करतात, त्या जनतेचे मत मांडण्याऐवजी ते ज्या राजकीय पक्षाचे सदस्य आहेत, त्या पक्षाच्या निदेर्शाप्रमाणेच कायदेमंडळात मत मांडू शकतात. हा लोकशाही संकुचित करण्याचा प्रकार ७५ वर्षांमध्ये दिसून आला.

**काही तरतुदी चांगल्या; पण... :** लोकप्रतिनिधी मतदानातून निवडून येऊन लोकशाही भरभक्कम करतात. पण, संविधानातील तरतुदीमुळे राज्यांचे वैधानिक प्रमुख म्हणून राज्यपाल हे निवडून न येता नियुक्त करण्यात येत असल्याने अशा प्रकारात लोकशाही संस्थगित झाली असल्याचे दिसून येते. मग अनेकदा ते लोकशाही नियुक्त शासनाच्या निर्णयावरही विपर्यस्त भूमिका घेतात आणि त्यामुळे लोकशाही कमकुवत होते की काय, अशी शंका येते.

दुसरीकडे, सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या परिक्षेत्रामधील सर्वांगीण विकासाच्या व रोजगारांच्या दृष्टीने आर्थिक विकास आराखडे, तसेच धार्मिक, जातीय आणि अन्य तणाव कमी करण्यासाठी सामाजिक न्याय आराखडे तयार करुन त्यांची अंमलबजावणी करावी, असे संविधानाने नमूद केले आहे. पण, देशभरातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. म्हणजे काही चांगल्या संविधानिक तरतुदींची चुकीच्या पद्धतीने अंमलबजावणी झाली किंवा ती झालीच नाही, असे दिसते.

ही स्थिती कशी बदलेल? येत्या २५ वर्षांत देशाची स्थिती बदलवायची असेल, तर संविधानाला अपेक्षित असा आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या समतल असलेला एकसंध समाज निर्माण करावा लागेल. देशात अलीकडे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय तणाव वाढल्याचे दिसून येते.

संविधानिक तरतुदींचा वापर करून हे तणाव कसे कमी करता येतील, यावर लक्ष केंद्रित केल्यास आणि त्याची अंमलबजावणी केल्यास देश जागतिक स्तरावर एक मोठी शक्ती बनू शकतो. चौथ्या औद्योगिक क्रांतीमुळे उद्योग - व्यवसायांच्या संधी किंवा नोकऱ्यांबाबत निर्माण होणाऱ्या आव्हानांवर तोडगा काढतानाच, देश अस्थिर होणार नाही, याकडे आता प्राधान्याने लक्ष द्यावे लागेल.

संविधानातील तरतुदीप्रमाणे लोकशाही ही मतदानाद्वारे स्थापित केली जाते. त्या मतदान प्रक्रियेवरच शंका निर्माण होत असेल, तर जनतेचा लोकशाहीवरील विश्वास उडू शकतो आणि त्यावरून त्या राज्यात किंवा देशात गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी या गोष्टीकडे राजकीय चष्म्यातून न पाहता, मतदान प्रक्रियेवर सर्वांचा विश्वास बसेल, असे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे.

संविधानाने न्यायपालिकेला स्वातंत्र्य दिले आहे. सध्या देशातील न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा डोंगर पाहता जनतेला न्याय मिळणे दुरापास्त झाले आहे. यामध्ये येत्या २५ वर्षांत कशी सुधारणा होईल, यासाठी कार्यपालिका म्हणजे सरकार आणि न्यायपालिका यांनी एकत्रित प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. अन्यथा, न्यायदानाच्या बाबतीत अन्याय होत असल्याची सार्वत्रिक भावना निर्माण होऊ शकते.

लोकशाही सुदृढ करण्यासाठी एकूणच व्यवस्थेचे कायदेमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका यामध्ये विभक्तीकरण करून जगापुढे अमेरिकेच्या संविधानाने एक आदर्श ठेवला आहे. असे असूनही हाच आदर्श अलीकडे व्यवस्था राबवणाऱ्यांच्या कृतीमुळे डळमळीत झाला आहे की काय, असे वातावरण तेथे निर्माण झाले आहे. त्यामुळे पुढच्या २५ वर्षांत आपल्या देशातील लोकशाही, संविधानिक व्यवस्था अधिकाधिक सुदृढ होत जाऊन, त्याद्वारे जनतेच्या सुखी, सामूहिक जीवनासाठी अनुकूल वातावरण निर्माण होण्याची आवश्यकता आहे. • •

## ➤ महत्त्वाचे

### देशी बनावटीचे पिस्तूल, जिवंत काडतूस बाळगणाऱ्या युवकावर अंबड पोलिसांत गुन्हा दाखल

**सिडको ।** अंबड परिसरातील संजीवनगर, इंडियन पेट्रोल पंपाजवळ विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तूल व जिवंत काडतूस बाळगणाऱ्या एका २३ वर्षीय युवकावर अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मेहबुब मुमताज अहमदखान (वय २३, रा. विराटनगर, अंबड लिंक रोड, चुंचाळे शिवार) असे आरोपीचे नाव असून, त्याच्याजवळ देशी बनावटीची लोखंडी पिस्तूल, प्लास्टिक कव्हरसह मॅगझीन, व “KF 7.65” असे इंग्रजीत कोरलेले एक जिवंत पितळी काडतूस सापडले आहे. या शस्त्रसाहित्याची एकूण किंमत अंदाजे ३०,५०० रुपये इतकी आहे. ही कारवाई ३ एप्रिल रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास पोलिसांनी केली. आरोपीकडे शस्त्र परवाना नसल्याने आणि त्याने शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याने त्याच्यावर शस्त्र अधिनियम कलम ३/२५ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक शेवाळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा क्रमांक २४८/२०२५ दाखल झाला असून, गुन्हे शाखा युनिट-२ चे पोलीस अंमलदार महेश खांडबहाले यांनी ही कारवाई केली. आरोपी अद्याप फरार असून पुढील तपास अंबड पोलीस करत आहेत.

### आयकर कॉलनीत तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सिडको ।** अंबडमधील आयकर कॉलनीत ४ एप्रिल रोजी एका ३२ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. हरेकृष्णा सत्यप्रकाश पांडे (वय ३२), रा. बी-१२, आयकर कॉलनी, कृष्णानगर, अंबड, यांनी आपल्या राहत्या घरात नायलॉन दोरीच्या सहाय्याने फॅनला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सकाळी ११:३० च्या सुमारास उघडकीस आली. कुरिअर देण्यासाठी वॉचमन त्यांच्या घरी गेला असता, दरवाजा उघडला गेला नाही. त्यामुळे त्याने ही माहिती ऑफिस स्टाफला दिली. स्टाफने तातडीने अंबड पोलीस ठाण्यात संपर्क साधला. दुपारी ३:०४ वाजता पोलीस व स्टाफच्या उपस्थितीत दरवाजा उघडण्यात आला असता पांडे यांचा मृतदेह फॅनला दोरीने लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती वपोनि राकेश हांडे व पोहवा देशमुख यांनी घेतली. त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस अधिक तपास करत आहेत. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### नाशिकचा डी.व्ही.सी.ए. विरुद्ध थरारक निर्णायक विजय



**नाशिक ।** येथे होत असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय १९ वर्षांखालील वयोगटातील आमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेच्या (एमसीए इन्विटेशन लीग) दोन दिवसीय कसोटीत हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर झालेल्या सामन्यात नाशिक संघाने डी.व्ही.सी.ए. क्लब, पुणे या बलाढ्य संघाविरुद्ध सामन्याच्या चौथ्या डावात विजयासाठी २४८ धावांचा यशस्वी पाठलाग करून सामन्यातील शेवटच्या षटकात ४ चेंडू बाकी असताना थरारक विजयाची नोंद केली. नाशिकच्या फलंदाजांनी विशेषतः दुसऱ्या डावात, उत्तम सांघिक कामगिरी केली. त्यातही कर्णधार समकित सुराणाने दोन्ही डावात अर्धशतके व सामन्यात ५ बळी अशी पुन्हा एकदा जोरदार अष्टपैलू कामगिरी केली, त्यास मुख्यतः वेद सोनवणे व हुजैफ शेख यांची उत्तम साथ मिळाली. प्रथम फलंदाजी मिळालेल्या डी.व्ही.सी.ए.ने सर्वबाद २१५ धावा केल्या. नाशिकच्या कर्णधार समकीत सुराणाने ३ तर कृष्णा केदार, व्यंकटेश बेहरे व नील चंद्रात्रेने प्रत्येकी २ व अथर्व सूर्यवंशीने १ बळी घेतला. उत्तरादाखल नाशिकच्या पहिल्या डावात सर्व बाद १३० च धावा झाल्या. समकीत सुराणाने ५३ व वेद सोनवणेने ३२ धावा केल्या. दुसऱ्या डावात डिडी.व्ही.सी.ए.ने ४ बाद १६२ धावांवर डाव घोषित करून चौथ्या डावात विजयासाठी नाशिकला २४८ धावांचे आव्हान दिले. डि व्हि सी एच्या अथर्वने नाबाद ७७ धावा केल्या. समकीत सुराणा व हुजैफ शेखने प्रत्येकी २ बळी घेतले. नाशिकच्या फलंदाजांनी दुसऱ्या डावात २४८ धावांचे आव्हान स्वीकारत आक्रमक सुरवात केली. सलामीवीर सोहम तमखाने ३१ चेंडूत ४३ - ५ चौकार व २ षटकार - व कृष्णा केदारने १७ चेंडूत २९ धावा -२ चौकार व २ षटकार - फटकावत केवळ ६ षटकांत बिनबाद ५७ व ११ व्या षटकात २ बाद ८४ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावरील वेद सोनवणेने ६८ चेंडूत ६०- ६ चौकार व १ षटकार - धावा केल्या. पण त्यानंतर ठराविक अंतराने फलंदाज बाद होत गेल्याने , व्यंकटेश बेहरे १५ धावा फटकावून, धावबाद झाल्यावर नाशिकची अवस्था ३६.१ षटकांत ७ बाद १८९ अशी झाली. पण त्यानंतर पाचव्या क्रमांकावरील कर्णधार समकित सुराणाला नवव्या क्रमांकावरील हुजैफ शेख याची उत्तम साथ मिळाली. कर्णधार समकीत सुराणाने ७२ चेंडूत ११ चौकारांसाह नाबाद ५३ तर हुजैफ शेखने २० चेंडूत २ चौकारांसाह नाबाद २३ अशी विजयी कामगिरी करत थरारक विजयाची नोंद केली.

# वावी आश्रमशाळेत भ्रष्टाचाराचे थैमान

## • पुरेशी पटसंख्या नसतांनाही अधिकचे अनुदान लाटण्यासाठी अधिकाऱ्यांना लाखो रुपयांचे वाटप • पटसंख्येत झोल • समाज कल्याणच्या आश्रमशाळेतील प्रकाराची एका व्हायरल फोन कॉलमधून चर्चा

(राम सुरसे यांजकडून)

**वावी ।** सिन्नर तालुक्यातील वावी येथील प्राथमिक आश्रम शाळेत वरील धक्कादायक प्रकार घडलेला असून सदर शाळा ही समाज कल्याण विभागाच्या अंतर्गत भटक्या व विमुक्त प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी चालवण्यात येते.

शाळेत मंजूर पटसंख्येपेक्षा निम्मे देखील विद्यार्थी शाळेत उपस्थित नसताना समाजकल्याण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना चिरीमिरी देऊन अनुदान लाटण्याचा प्रकार मागील अनेक वर्षांपासून सुरू असल्याचे याच शाळेतील एका शिक्षकाच्या आवाजातील व्हायरल मोबाईल कॉलमुळे सर्वच प्रकार बाहेर आला असून कश्या प्रकारे शासनाचे पैसे लाटले जातात याची पोलखोल झालेली आहे.

सिन्नर येथील राजा शिवछत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेकडून सिन्नर तालुक्यातील वावी येथे भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांसाठी निवासी आश्रम शाळा आणि विंचूर दळवी येथे माध्यमिक शाळा चालवली जाते. वावी येथील आश्रम शाळेत विद्यार्थी पटसंख्या १२० च्या आसपास मंजूर असताना आज तेथे निम्मे देखील विद्यार्थी नाहीत. असे असताना समाज कल्याण विभागाचे नाशिकचे विभागीय अधिकारी यांच्या नावाने पैसे घेऊन हजर विद्यार्थी संख्या पटसंखेच्या आसपास दाखवण्याचा अहवाल दिला जातो आणि शाळेला शंभर टक्के अनुदान मिळते असा व्हायरल कॉलमध्ये उल्लेख आहे. आश्रम शाळेच्या अधीक्षकाचा सदर व्हायरल कॉल असून त्यात पुणे येथील समाजकल्याण आयुक्त कार्यालयातील एका अधिकाऱ्याने शाळेला व्हिजिट केल्यानंतर या प्रकाराबाबत त्या अधिकाऱ्याने शाळा प्रशासनाचे कान टोचल्याचे म्हटले आहे. मंजूर १२० ऐवजी केवळ ५६ विद्यार्थी शाळेत हजर होते. त्याचे स्पष्टीकरण पुणे येथील अधिकाऱ्याने मागितले असता विद्यार्थी आई वडिलांच्या समवेत वीटभट्टी अथवा ऊस तोडणीसाठी सोबत गेल्याचे सांगण्यात आले. मात्र परीक्षांच्या तोंडावर ही मुले घरी सोडलीच कशी हा प्रश्न निरुत्तर करणारा ठरल्याचे अधीक्षकाने व्हायरल कॉल मध्ये दिसून येते. सदर कॉल वरील संभाषण मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातील असल्याचे समजते.



त्या व्हायरल क्लिप मध्ये असलेल्या संभाषणाबाबत संस्थेचे अध्यक्ष साहेबराव गुंजाळ यांनी नकार व्यक्त केला. शाळेमध्ये १२० पैकी ११८ विद्यार्थी उपस्थित असल्याचे ते म्हणाले. कोणीतरी हेतू पूर्वकचुकीच्या संभाषणाची सदर क्लिप व्हायरल केली आहे. त्या क्लिप बद्दल मुख्याध्यापकांकडून माहिती मिळाली. मात्र शाळेत जाऊन चौकशी केल्यावरच अधिक बोलता येईल असे त्यांनी सांगितले. क्लिप वायरल होऊन दोन आठवडे उलटले तरी संस्थेचे अध्यक्ष शाळेत गेले नाही हा त्यांचा दावा हास्यास्पद म्हणावा लागेल.

“ मी सदर शाळेचा संस्थापक आहे. युती सरकारच्या काळात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने शाळेला मंजुरी मिळाली होती. शासनाचे अनुदान सुरू झाल्यानंतर मला पद्धतशीरपणे अध्यक्ष आणि संचालक पदावरून दूर करण्यात आले. शाळेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आहे. संस्था नोंदणीची सर्व मूळ कागदपत्रे माझ्याजवळ असताना शासनाकडून कोणत्या प्रमाणपत्रांच्या आधारावर आजपर्यंत अनुदान वितरित झाले हा प्रश्न आहे. बाहेरच्या शाळेत शिकणाऱ्या मुलांचे रेकॉर्ड वावी आश्रम शाळेत मेंटेन करण्यात येते. प्रत्यक्षात ती मुले आश्रम शाळेत शिकत नाही. त्यांच्या नावावर संस्थाचालक अधिकाऱ्यांना हाताशी धरून लाखोंचा मलिदा अनुदान रुपात खातात.

**– दिगंबर देशमुख (शिवसेनेचे माजी पदाधिकारी तथा शाळेचे संस्थापक)**

सदर क्लिप मधील संभाषणानुसार पुणे येथील खिल्लारी नामक अधिकाऱ्याने शाळेत भेट दिली असता विद्यार्थी पटसंख्या निम्म्यापेक्षा कमी आढळून आली. आम्ही दरवर्षी अधिकाऱ्यांना सांभाळतो व ते पूर्ण पटसंख्या असल्याचा अहवाल देऊन अनुदान वितरित करतात असे अधीक्षकाने त्या संभाषणात म्हटले आहे. नाशिक येथील वीर आणि पाटील या दोन अधिकाऱ्यांच्या नावाचा संभाषणात स्पष्ट उल्लेख आला असून वीर यांना दोन लाख रुपये दिल्याचे म्हटले आहे. या संदर्भात प्रस्तुत प्रतिनिधीने नाशिकचे समाज कल्याण विभागाचे उपसंचालक भगवान वीर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद देणे टाळले.

शाळेच्या अधीक्षकाकडून (धनवटे नामक) त्याच्या एका माजी शिक्षक असलेल्या नातेवाईकास सदर कॉल झाल्याचे संभाषणावरून कळते. पुणे येथील अधिकाऱ्याने आपणास निलंबनाची धमकी दिली असे अधीक्षकाने म्हटल्यावर समोरील व्यक्ती तुम्ही त्यांना पैसे घेण्यासाठी जागा करून दिली आहे. ज्या पद्धतीने नाशिकच्या अधिकाऱ्यांना पैसे देऊन पटसंख्या नियमित दाखवली त्याच पद्धतीने पुणे येथील अधिकारी पैसे घेऊन तुमच्याकडे विद्यार्थी संख्या ११८ च्या आसपास आढळल्याचा अहवाल देईल. त्यामुळे तुमच्या वरील कारवाई टळेल आणि संस्थेला मिळणारे अनुदानही रखडणार नाही असा संभाषणात उल्लेख आहे.तर शाळेचा अधीक्षक म्हणतो पहिली माझीच शाळा तपासली अण्यथा मी प्रत्येक वेळी तयारीतच असतो. (म्हणजेच डम्मी मुले बसवीत असणार), आमचे शाळेत ७० पटसंख्याच आहे परंतू अधीक्षक वीर व उप अधीक्षक योगेश पाटील यांना आम्ही पैसे देतो मग ते ११७/११८ पटसंख्या दाखवितात व तसे त्यांचे मागीलशेरे आहे.

# समाजामध्ये सर्वप्रथम झाला पाहिजे वैदिकांचा सन्मान!



**नाशिक ।** वारकरी संप्रदाय हा वैदिक तत्वज्ञानावर आधारित असून मुळ वेदांचे ज्ञान असणारे वैदिक पंडित आजच्या युगात ऋषितुल्य जीवन जगत असतात आपल्या बालपणापासून संपूर्ण जीवन आचार विचारपूर्वक वेदशास्त्रावर निष्ठा ठेवून वागत असतात वैदिक आचार जीवन पद्धती ही अत्यंत श्रेष्ठ असून विज्ञान निष्ठ आहे त्यामुळे वेदांचे पारायण करणारे हे समाजाचे खरे आधारस्तंभ असून वैदिक विद्वानांचा सन्मान हा सर्वात आधी होणे गरजेचे आहे तेच कार्य शृंगेरी शारदा पीठ करीत आहे, त्यामुळे भारतामध्ये या धर्मपिठास खूप मोठी मान्यता आहे. पंचवटीतील शृंगेरी मठ सातत्याने समाजाला एक चांगली दिशा देण्याचं कार्य करीत आहे असे प्रतिपादन हभप महंत पंडित गुरुजी यांनी केले.

श्री शारदापीठाधीश्वर जगद्गुरू शंकराचार्य श्री श्री भारतीतीर्थ महास्वामीजी यांच्या अमृतमहोत्सवा निमित्त तीन दिवस श्री श्रृंगेरी शंकराचार्य मठ, सरदार चौक, श्री काळाराम मंदिर रोड, पंचवटी येथे वज्रोत्सव भारती कार्यक्रम, चतुर्वेद संहिता पारायण व अमृत महामृत्युंजय याग, वैदिक विद्वानांचा सन्मान सोहळा यासह विविध धार्मिक कार्यक्रम झाले. चैत्र शुद्ध पंचमीला सकाळी ९.०० वा. चतुर्वेद संहिता शेष पारायण होईल, यात चतुर्वेदोक्त शांतीसूक्त संकल्प, प्रातः पूजन, लघुरुद्राभिषेक, अमृत मृत्युंजय हवन, सप्त चिरंजीव हवन, मार्कंडेय हवन, उत्तरांग बलिदान पूर्णाहुती, गुरू पादपूजा, महाआरती इ. कार्यक्रम झाले. मुख्य करून चार वेदांचे पारायण, अमृत मृत्युंजय हवन, सायंकाळी हरिभक्तिपरायण पंडित गुरुजी यांचे सुश्राव्य हरिकीर्तन वैदिकांचा सन्मान, प्रास्ताविक रवींद्र पैठणे, आभार प्रदर्शन रामगोपाल अय्यर यांनी केले.

### हभप महंत पंडित गुरुजी यांचे प्रतिपादन

ऋग्वेद पारायणसाठी पुणे येथील घनपाठी अमरदीप कुरुंभट्टे, शुक्ल यजुर्वेद पारायण यासाठी आळंदी येथील घनपाठी वेदमूर्ती निखिल प्रसादे, कृष्ण यजुर्वेद पारायणासाठी कर्नाटक येथून घनपाठी वेदमूर्ती दत्तप्रसाद शर्मा, सामवेद पारायणा साठी वेदमूर्ती श्रीकृष्ण पळसकर, अथर्ववेद पारायणा साठी वेदमूर्ती दिनकर जोशी गुरुजी यांनी प्रारंभ केला या कार्यक्रमांमध्ये वेदमूर्ती दिनेश गायधनी, व २१ ब्रह्मवृंद सहकारी आहेत. त्यावेळी या चारही वैदिकांचा सन्मान सोहळा संपन्न झाला. तसेच अमृत मृत्युंजय महायाग पूर्णाहूती व सायंकाळी हरिभक्ति परायण श्री पंडित गुरुजी यांचे जाहीर हरिकीर्तन संपन्न झाले.

# प्रामाणिकपणा हीच खरी देशसेवा : अरुण पगार




**नासाका विद्यालयात अधिकारी पदांवर निवड झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांसह पूजा डुंबरे, शुभम गाडेकर, सार्थक पानसरे, शरद मुठाळ मुख्याध्यापक अरुण पगार आदींसह शिक्षक, कर्मचारी.**

**नाशिकरोड ।** संघर्ष आणि सहनशीलतेची प्रेरणा घेऊन आपण प्राप्त केलेले यश हे निश्चितच प्रेरणादायी असते. ज्या क्षेत्रात आपली निवड झाली; त्या ठिकाणी प्रामाणिकपणे सेवा करणे, हीच खरी देशसेवा आहे, असे प्रतिपादन नासाका विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण पगार यांनी केले.

पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात विविध पदांवर नियुक्त झालेल्या माजी विद्यार्थी सन्मान सोहळ्यात सन्मान सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. मंचावर सन्मानार्थी विद्यार्थ्यांसह पूजा डुंबरे, शुभम गाडेकर, सार्थक पानसरे, शरद मुठाळ आदींसह शिक्षक-कर्मचारी उपस्थित होते. माजी विद्यार्थी आणि विविध पदांवर निवड झालेल्या सूरज डुंबरे (भारतीय सैन्यदल), जयश्री मुठाळ (मुंबई शहर पोलीस), मनकर्णिका काळे (मुंबई पोलीस) यांचा सन्मानचिन्ह आणि ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारार्थी गुणवंतांनी यशासाठी खडतर परिश्रम आवश्यक असतात. कधी आलेल्या अपयशाने खचून न जाता सतत प्रयत्न करावे लागतात; तेव्हा यश मिळतं. शालेय वयात मंचासमोर बसून सन्मानसोहळा पाहणं आणि मंचावर येऊन सन्मान स्वीकारण्याचा प्रवास हा अतिशय खडतर असतो. कुटुंब, शाळा यांच्यासह यशासाठी स्वतःचे प्रयत्न अत्यावश्यक असतात, असे सांगितले. सांस्कृतिक विभाग प्रमुख कैलास लहांगे यांनी आभार मानले तर शिक्षक रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

# गांडूळ खत प्रकल्पातून विषमुक्त शेती

## अनिता जाधव यांचा शेनीत येथे यशस्वी प्रयोग

(लक्ष्मण सोनवणे यांजकडून)





**शेनीत (ता. इगतपुरी) गांडूळ खत निर्मिती केलेले बेड दुसऱ्या फोटोत कृषी सखी अनिता जाधव यांनी केलेल्या विषमुक्त शेतीची माहिती घेताना नांदगाव बुद्रुक विविध कार्यकारी संस्थेचे माजी चेअरमन दादाभाऊ शिरसाठ, दीपक जाधव आदी. (छाया : लक्ष्मण सोनवणे)**

**बेलगाव कुऱ्हे ।** रासायनिक खतांच्या अति वापरामुळे जमिनीची सुपीकता नाहीशी होत चालली असून, याची आरोग्यावर मोठी हानी होते. त्यासाठी नैसर्गिक शेतीची कास धरणे आवश्यक आहे.

जमिनीची नैसर्गिक सुपीकता वाढविण्यासाठी इगतपुरी तालुक्यातील शेनीत येथील चैतन्य स्वयंसहाय्यता बचत गटाच्या कृषिसखी असलेल्या अनिता दीपक जाधव यांनी घराजवळ स्वबळावर गांडूळ खताची निर्मिती करीत भाजीपाला व गव्हाची विषमुक्त शेती केली आहे. नांदगाव बुद्रुक विविध कार्यकारी संस्थेचे माजी चेअरमन दादाभाऊ शिरसाठ यांनी विषमुक्त शेतीला भेट देऊन माहिती जाणून घेतली व अनिताताई जाधव यांचे कौतुक केले. जमिनीच्या जमिनीच्या आरोग्यासाठी गांडुळखत अतिशय उपयुक्त असून लवकरच सेंद्रीय शेतीकडे वळणार असल्याचे शिरसाठ म्हणाले. गांडूळ खत शेतीमधील पिकांची गुणवत्ता व उत्पादनक्षमता वाढवते, शेतीसाठी सुलभ आणि कमी खर्चात मोठा टिकाऊ पर्याय आहे. गांडूळ खतांच्या माध्यमातून भाजीपाला पिकवतात. पिकवलेला काही भाजीपाला विक्री करतात तर उरलेला कुटुंबासाठी वापरतात. दहावी पर्यंत शिक्षण झालेल्या अनिता ताईंनी विविध ठिकाणाहून माहिती मार्गदर्शन घेऊन १४ बाय चार फूट अंतरावर गांडूळ खत बेड तयार केले असून त्यासाठी सावली केली आहे. यासाठी शेणखत, पाला पाचोळा टाकून गांडूळखत तयार करतात. नियमित पाणी देऊन खत तयार होण्यास दीड महिन्याचा कालावधी लागतो. शेतीसाठी जीवामृतचा उपयोग करतात. सासूबाई कमळाबाई, पती दीपक, मुलगा अतुल यांची शेती कामात मदत होते. गांडूळ खत हे जैविक (सेंद्रिय खत) असून आरोग्यावर कोणतेही वाईट परिणाम होत नाही. गांडूळ खत तयार करण्यासाठी कमी खर्च येतो, शेतकरी बांधवांनी सेंद्रिय विषमुक्त शेती करावी असे आवाहन कृषी सखी अनिता दीपक जाधव यांनी केले.

# महासागर कर्मयोगी पुरस्कार














# एचएसआरपी नंबर प्लेट गुजरातपेक्षा महाराष्ट्रात महाग का?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**

देशभरात २०१९ पूर्वी निर्मित सर्व वाहनांमध्ये हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातही नंबर प्लेट बदलवले जात आहेत.

मात्र गुजरात, आंध्रप्रदेशसारख्या इतर शेजारी राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वाधिक दर का आहेत, असा प्रश्न उपस्थित करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली. उच्च न्यायालयाने राज्य परिवहन आयुक्तांना तीन आठवड्यात जबाब नोंदवण्याचे आदेश दिले.

सुदर्शन बागडे यांनी ही याचिका दाखल केली आहे. याचिकेवर न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. याचिकेनुसार, देशासह संपूर्ण राज्यात एचएसआरपी प्लेट लावण्यात येत आहे. याचा आर्थिक भार वाहनचालकांवर बसत आहे.

२०१८ साली सर्वोच्च न्यायालयाने एचएसआरपीबाबत निर्णय देताना स्पष्ट केले होते की, वाहनांमध्ये वापरण्यात येणाऱ्या इंधनाचे वर्गीकरण करण्यासाठी विविध रंगांचे होलोग्राम स्टिकर्स लावावे. यामागे रस्ते सुरक्षा, वाहतूक नियमांची अंमलबजावणी करणे हा उद्देश होता. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना नंबर प्लेटच्या दरांबाबत काहीही सांगितले नव्हते. त्यामुळे देशातील राज्यांमध्ये वेगवेगळ्या दर आकारण्यात येत आहेत.



## उच्च न्यायालयात प्रश्न

महाराष्ट्रात सर्वाधिक वाहनसंख्या आहे, मात्र तरीही सर्वाधिक दर आकारला जात आहे. याचा भुर्दंड नागरिकांना बसत आहे. त्यामुळे राज्यात मुबलक दरात एचएसआरपी प्लेट उपलब्ध होईपर्यंत यावर बंदी घालण्यात यावी, सर्व भागात समान दर असावे, अशी मागणी याचिकाकर्त्यांने केली आहे. याचिकेवर पुढील सुनावणी २५ एप्रिल रोजी होईल.

महाराष्ट्राच्या शेजारील गुजरात, आंध्रप्रदेश, गोवा या राज्यात एचएसआरपी प्लेटचे दर कमी आहेत. मात्र महाराष्ट्रात ते सर्वाधिक आहेत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. कमी दरात ही सुविधा उपलब्ध करून देणे इतर राज्यांना शक्य आहे तर महाराष्ट्राला का नाही, अशी मौखिक विचारणा करत न्यायालयाने परिवहन आयुक्तांना जबाब नोंदवण्याचे आदेश दिले.

महाराष्ट्रामध्ये एचएसआरपी बसवण्यासाठीची अंतिम मुदत ३१ मार्च २०२५ होती, जी आता पुन्हा वाढून ३० जून २०२५ पर्यंत झाली आहे. राज्यात १ एप्रिल २०१९ पूर्वी खरेदी केलेल्या वाहनांवर या नंबरप्लेट नाहीत. त्यामुळे दिलेल्या मुदतीत त्यांना ही प्रक्रिया पूर्ण करावी लागेल, अन्यथा नियमानुसार दंड आकारण्यात येणार असल्याचा इशारा परिवहन खात्याने दिला आहे. दरम्यान, या नव्या आदेशाने अनेक वाहनधारकांमध्ये कमालीचा असंतोष पसरल्याचे दिसून येते.

# तांदळाची भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

## खासदार डॉ. नामदेव किरसान यांची संसदेत मागणी

■ **महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. ५ :**



राईस मिलमध्ये घोटाळा करून तांदळाची मिलावट करणाऱ्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी संसदेत केली.

शासकीय धान खरेदी केंद्र व महामंडळातून ते धान्य जिल्ह्यातील मोठ्या राईस मिलमध्ये पिसाई करून ते तांदूळ शासकीय महामंडळाच्या माध्यमातून सरकारी स्वस्त धान्य दुकानात पोहचवायचा असतो. मात्र शासकीय धान खरेदी केंद्रातून प्राप्त होणाऱ्या धानापासून मिळणारे उच्च प्रतिचा तांदूळ राईस मिलमध्ये भरडाई झाल्यावर बरेच राईस मिलर्स बाहेर विकतात व त्या जागी अतिशय निकृष्ट दर्जाचे तांदूळ सरकारी महामंडळात जमा करतात.

त्यामुळे सरकारी स्वस्त धान्य दुकानात ते निकृष्ट दर्जाचे तांदूळ पोहचविल्या जाते, असा भ्रष्ट कारभार करणाऱ्या राईस मिलर्सची चौकशी करून कडक कारवाई करण्याची मागणी गडचिरोली - चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी संसदेत केली.

# कृषीमंत्री असंवेदनशील

## वडेट्टीवार यांची टीका

■ **महासागर प्रतिनिधी चंद्रपूर, दि. ५ :**

राज्यात विदर्भ, मराठवाड्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना फटका बसला आहे. तूर, द्राक्ष, कांदा, भाजीपाला अशा पिकांचे नुकसान झाले आहे. अशा वेळी शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी कृषीमंत्र्यांची भाषा ही असंवेदनशील असल्याची टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

हाताशी आलेले पिक गेल्याने बळीराजा अडचणीत असताना त्यांना समजून घेण्याऐवजी महायुतीच्या मंत्र्यांची भाषा अरेरावीची आहे. बहुमत मिळाल्याने कोणी आमचे वाकडे करू शकणार नाही असेच या मंत्र्यांना वाटत असल्याने शेतकऱ्यांना सरकारने वाऱ्यावर सोडलं आहे अशी टीका वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना केली .

# आयपीएल सट्टेबाजांवर धाडी

## दोन घटनात ११ आरोपी गजाआड, लाखोचा माल जप्त

■ **महासागर प्रतिनिधी भंडारा, दि. ५ :**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेवर सट्टा व्यवसाय करणाऱ्यांवर भंडारा आणि तुमसर पोलिसांनी जोरदार कारवाई केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने आयपीएल क्रिकेट सट्टा जुगाराचा पदार्फाश केला. पोलिसांनी खरबी येथे क्रिकेट सट्टा खेळताना आरोपीला रंगेहाथ पकडले. यावेळी आरोपीच्या ताब्यातून ६३ हजार ७१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, खरबी येथे आयपीएल सामन्यांवर ऑनलाइन सट्टा सुरू आहे. या माहितीच्या आधारावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मौजा खरबी येथील अजय गोस्वामी यांच्या घरी जाऊन झडती घेतली. यावेळी आशिष गिरेपुंजे नावाचा व्यक्ती आयपीएलच्या थेट प्रक्षेपणावर मोबाईलद्वारे क्रिकेट सट्टा खेळत असताना पकडला गेला. त्याच्याकडून तीन मोबाईल (मुल्य ३६,०००), २,१६० रुपये रोख रक्कम, एक मोटारसायकल (किंमत ५५,००० रुपये), कॅल्कुलेटर (किंमत ५०० रुपये) आणि इतर साहित्य असा एकूण ६३,७१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी आरोपीची विचारपूस केली असता, तो मनोज प्रकाश नवखरे (रा. सुभाष वार्ड, गणेशपूर) याच्यासाठी काम करत असल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी पंचनामा करून मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आशिष प्रेमजी गिरेपुंजे (वय ३३रा. खरबी, ता.जि.भंडारा) आणि मनोज प्रकाश नवखरे (रा. सुभाष वार्ड गणेशपुर, ता. जि. भंडारा) या दोघांविरोधात जवाहर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम सहकलम ४६ भारतीय न्याय सहिंता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक भंडारा, अपर पोलिस अधीक्षक भंडारा यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नितीन चिंचोळकर, सहायक पोलिस निरीक्षक केशव पुंजरवाड, हवालदार नितिन महाजन, प्रफुल कठाणे, शिपाई मंगेश मालोदे यांनी केली. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक केशव पुंजरवाड करीत आहेत.

आणखी एका घटनेत तुमसर पोलिसांनी शहरात वेगवेगळ्या ठिकाणी सुरु असलेल्या आयपीएल सट्टा बाजारांवर धाड घालुन आरोपींवर गुन्हे दाखल करुन अटक केली आहे. दोन वेगवेगळ्या ठिकाणी एकाच रात्री केलेल्या धाडीत ९ आरोपींविरुद्ध दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलिसांनी ६ अँड्रॉइड मोबाईलसह ७४,००२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला .

पोलिस निरीक्षक संजय गायकवाड, पो.नि. मिलिंद तायडे, पोउपनि प्रविण सयाम आणि पोउपनि धर्मेंद्र बोरकर हे तुमसर पोलीस ठाण्यात असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरून गॅलेक्सी बारजवळ आणि मालवीय वार्ड येथे सट्टेबाजांवर धाड टाकण्यात आली.

रात्री पोउपनि धर्मेंद्र बोरकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद सामन्यावर सुरू असलेल्या सट्ट्यावर धाड टाकली. या ठिकाणी योगेश रमेश तिजारे (३२) आणि विवेक उर्फ विक्की रविशंकर कौशल (२७) या दोन आरोपींना अटक करण्यात आली.

तपासात उघड झाले की हे आरोपी योगेश श्रीधर चकोले, सोनू अग्रवाल, संजय हंसराज साठवने आणि धीरज बालपांडे यांच्या सांगण्यावरून सट्टा चालवत होते. याप्रकरणी अप. क्र. १८४/२०२५ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

रात्री पोउपनि प्रविण सयाम यांच्या पथकाने मालवीय वार्ड येथे दुसरी कारवाई करत सुरेश दामोदर चकोले याला मोबाईलवरून सट्टा खेळताना रंगेहाथ पकडले. तपासात त्याच्यासोबत शुभम दामोदर चकोले आणि संजय साठवने यांचाही सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी अप. क्र. १८३/२०२५ नोंद करण्यात आला आहे.या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ६ अँड्रॉइड मोबाईल आणि सट्ट्याचे रेकॉर्डसह ७४००२ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. काही आरोपी अद्याप फरार असून, त्यांच्या अटकेसाठी पोलीस अधिक तपास करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नुरुल हसन, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय अधिकारी गोफणे, पो.नि. संजय गायकवाड व पो.नि. मिलिंद तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पोउपनि प्रविण सयाम, पोउपनि धर्मेंद्र बोरकर तसेच पो. हवा. कनोजीया, पो.शि. नितीन झंझाड, पो.शि. काचगुंडे, पो. गिरीपुंजे आणि पो.शि. मुलकलवार करत आहेत.

आयपीएल क्रिकेट स्पर्धेवर जुगार लावण्याचे प्रमाण सर्वत्र वाढले असून, पोलीस अशा आरोपींचा कटाक्षाने शोध घेत आहेत.

# ४० किलो गांजासह पाच जण अटकेत

■ **महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. ५ :**

कारमधून गांजा तस्करी करणाऱ्या पाच जणांना गुन्हे शाखेच्या युनिट २ ने अटक केली. या कारवाईत ४०.३५ किलो गांजा, कार, मोबाइल व रोख असा एकूण १३ लाख ५२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये तीन तरुणींचा समावेश आहे. ही कारवाई शुक्रवारी दुपारी नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीतील वाळकी मार्गावर करण्यात आली.

सै. रशीद सै. जमशिद (३५), अरफाक दानिश शब्बीर पटेल (२३, दोघेही रा. जुनी वस्ती, बडनेरा) या दोघांसह १९ ते २२ वयोगटातील तीन तरुणींना अटक करण्यात आली. नांदगाव पेठ टोल नाक्याकडून वाळकी गावाकडे कारमधून दोन पुरुष व तीन महिला गांजाची तस्करी करत असल्याची माहिती गस्तीवर असलेल्या गुन्हे शाखेच्या युनिट दोनला मिळाली. या माहितीच्या आधारावर वाळकी मार्गावर नाकाबंदी करून ही कार थांबवण्यात आली. कारची झडती घेतल्यावर त्यात ४०.३५ किलो गांजा आढळून आला. त्यानुसार गुन्हे शाखेच्या युनिट दोनने पाचही आरोपींना अटक केली.

# द मीडिया फाउंडेशनतर्फे माजी खा. डॉ. अशोक नेते यांचा सत्कार

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ५ :**

द मीडिया फाऊंडेशनतर्फे राष्ट्रीय पत्रकारिता उत्कृष्टता पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हा सोहळा हॉटेल लँडमार्क, गडचिरोली येथे पार पडला. या सोहळ्यात राजकीय व सामाजिक क्षेत्रातील योगदान तसेच डॉक्टरेट पदवी मिळविल्याबद्दल माजी खासदार डॉ. अशोक नेते यांचा गौरव चिन्ह, शाल व श्रीफळ देवून विशेष सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात जय जय महाराष्ट्र माझा या गौरवगीताने झाली. प्रमुख अतिथी डॉ. अशोक नेते यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास पद्मश्री डॉ. परशुराम खुणे, सिनेट अध्यक्षा तनुश्री आत्राम, मानवाधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा भाजपा जिल्हा उपाध्यक्ष डॉ. प्रणय खुणे, अभियंता साखरवाडे, जयंतजी चौधरी, त्रिपाठी, द्याद मिडिया फाऊंडेशन संस्थापक ब्रम्हानंद तिवारी, मानवाधिकार संघटनेचे प्रवक्ता ज्ञानेंद्रजी विशवास, भाजपा जिल्हा महामंत्री प्रकाश गेडाम, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. भारत खटी, जिल्हा उपाध्यक्ष अरुण हरडे यांसारखे विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी खा. डॉ. अशोक नेते म्हणाले, पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून सामाजिक, राजकीय व शैक्षणिक घडामोडींचे सत्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. निःपक्षपाती आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेचा आदर्श ठेवणे गरजेचे आहे. यासोबतच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या उल्लेखनीय व्यक्तींचा या ठिकाणी सत्कार करण्यात आला. चांगला कार्यक्रम आयोजित केला त्याबद्दल या कार्यक्रमाला धन्यवाद देतो, असे ते म्हणाले. यावेळी जिल्हाभरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायपूरची सौरक्रांती : वर्धा जिल्ह्याचे नवे 'हरित' गाव!

■ **महासागर प्रतिनिधी वर्धा, दि. ५ :**

जिल्ह्यातील रायपूर गावाने सौर ऊर्जेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. देवळी तालुक्यातील या गावाने १०० टक्के सौर ऊजेर्चा वापर करून जिल्ह्यातील तिसरे सौरग्राम होण्याचा मान मिळवला आहे. महावितरणच्या नागपूर परिमंडलांतर्गत चिचघाट राठी आणि नेरी (पुनर्वसन) पाठोपाठ या सौरग्रामच्या यादीत रायपूरचे नाव आता जोडले गेले आहे.





गावातील १८ घरगुती आणि १ पथदिव्याच्या वीज जोडण्या आता पूर्णपणे सौर ऊर्जेवर चालणार आहेत, ज्यामुळे गावकऱ्यांचे वीज बिल शून्यावर येणार आहे. पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजनेचा लाभ घेत १६ घरांच्या छतावर प्रत्येकी २ किलोवॅटचे स्वतंत्र सौर प्रकल्प बसविण्यात आले आहेत. तसेच, एका घरावर १ किलोवॅटचा प्रकल्प आणि पथदिव्यांसाठी १ किलोवॅट क्षमतेची विनाअनुदानित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पांमधून दरमहा सरासरी ५१०० युनिट सौर ऊर्जा निर्मिती होणार आहे.

रायपूरला १०० टक्के सौर गाव बनवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्रा, संचालक (संचालन) अरविंद भादीकर, संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांच्या मार्गदर्शनात प्रादेशिक संचालक परेश भागवत, कार्यकारी संचालक (विशेष प्रकल्प) धनंजय औंढेकर, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके आणि वर्धा मंडलाच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्नील गोतमारे, कार्यकारी अभियंता (प्रशासन) प्रदिप घोरुडे, देवळी उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता प्रेम तेलरांधे, सहाय्यक अभियंता मयूर हेडाऊ आणि जनमित्र संतोष आत्राम यांनी अथक परिश्रम घेतले.

या सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे रायपूर गावातील नागरिकांना केवळ आर्थिक फायदा होणार नाही, तर पर्यावरण संवर्धनातही रायपूरचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे.